बालमित्रांसाठी!
40 दिवसांचा
प्रार्थना
करार

कृपा हे स्वर्गीय पित्या, तू माझ्यावर प्रीती केली आहे. आणि मला देखील आपल्या मुलांपैकी एक बनवल्याबद्दल मी तुझा आभारी आहे.

प्रीती तुझ्या आज्ञा पाळण्यास आणि तुझ्यावर प्रेम करण्यास मला मदत कर.

दया जशी तू माझ्यावर प्रीती केली तशी इतरांवर प्रीती करण्यास मला सहाय्य कर.

पश्चाताप माझ्या पापांची मला क्षमा कर, मला धुऊन शुध्द कर.

उपासना मी पूर्ण मनाने तुझे गौरव करील.

निर्णय येशू तू माझा प्रभू आहे, म्हणून मी तुझ्या मागे चालु इच्छितो.

अवलंबून राहणे मला तुझ्या पवित्र आत्म्याने भर.

प्रभाव मला तुझ्या कृपाचे, सत्यचे व न्यायाचे साधन बनव.

शिष्यत्त्व मला तुझ्या गौरवासाठी उपयोगात आण आणि इतरांनाही तुझ्या मागे चालावे असे आमंत्रण देण्यासाठी माझा उपयोग कर.

अधिकार येशूच्या नावात मी प्रार्थना करतो आमेन.

Copyright ©2014 The 40 Day Prayer Covenant Inc. All rights reserved.

बालमित्रांसाठी!
40 दिवसांचा
प्रार्थना
करार

संदर्भ

1 योहान 3:1
आपल्याला देवाची मुले हे नाव मिळाले, ह्यात पित्याने आपल्यावर केवढी मोठी दया केली, आहे हे पहा!

मत्तय 22 37 :38
येशू त्याला म्हणाला, "तू आपला देव परमेश्वर ह्याच्यावर पूर्ण जीवाने, पूर्ण मनाने, पूर्ण अंत:करणाने प्रीती कर, हीच पहिली व मोठी आज्ञा आहे."

योहान 15:12
जशी मी तुमच्यावर प्रीती केली, तशी तुम्ही एकमेकांवर प्रीती करावी,' अशी माझी आज्ञा आहे.

स्तोत्र 51:2
मला धुऊन माझा दोष पूर्णपणे काढून टाक, माझे पाप दूर करून मला निर्मळ कर.

स्तोत्रसंहिता 9:1
मी अगदी मनापासून परमेश्वराचे उपकारस्मरण करिन, व तुझ्या सर्व अद्भुत कृतींचे वर्णन करिन.

योहान 13:13
तुम्ही मला 'गुरू व प्रभू' असे संबोधिता, ते तुम्ही बरोबरच बोलता, कारण मी तसाच आहे.

इफिस 5:18 भाग 2:
आत्माने परिपूर्ण व्हा.

योहान 1:14
आणि आम्ही त्याचे गौरव पाहिले तो पित्यापासून आलेल्या एकुलत्या एकाचा गौरव असावा, असा अनुग्रह व सत्य ह्यांनी परीपूर्ण होता.

मत्तय 28:29
तेव्हा तुम्ही जाऊन सर्व राष्ट्रांतील लोकांना आपले शिष्य बनवा. त्यांना पित्याच्या, पुत्राच्या व पवित्र आत्म्याच्या नावाने बाप्तिस्मा द्या.

फिलीप्प 2:9
ह्यामुळे देवाने त्याला अति उच्च केले, आणि सर्व नावांपेक्षा जे सर्वात श्रेष्ठ नाव ते त्याला दिले.

Copyright ©2014 The 40 Day Prayer Covenant Inc. All rights reserved.

बालमित्रांसाठी

प्रार्थना कराचे सामर्थ्य

कॅण्डी मार्बेली

आणि **स्टिफन अइरे**

चित्रे **लूक फ्लॉवर्स** | प्रस्तावना **जेरी कर्क**

40 Day Prayer Covenant Inc.
P.O. Box 40841
Cincinnati, OH 45240
www.theprayercovenant.org

Copyright © 2014 by Candy Marballi. All rights reserved.

All rights reserved. No part of this book may be produced by any means, electronic, mechanical, photocopying, scanning, or otherwise without permission in writing from the publisher, except by a reviewer, who may quote passages in a review. The 40 Day Prayer Covenant Card may be copied but not altered, edited, or amended and is also available online with free downloads at **www.theprayercovenant.org**.

Materials to supplement *The Power of the Prayer Covenant for Kids* are available at www.theprayercovenant.org, including free multiple-language versions of *The 40 Day Prayer Covenant Kids' Version* cards and full color Worksheets. Special discounts are available for bulk purchases.

Unless otherwise stated, biblical quotations are taken from THE HOLY BIBLE, NEW INTERNATIONAL VERSION®, NIV®
Copyright © 1973, 1978, 1984, 2011 by Biblica, Inc.™ Used by permission. All rights reserved worldwide.

Design by Sound Press

ISBN 978-0-9899525-1-4

Printed in India by www.devtechprinters.com

प्रतिक्रिया

हा चाळीस दिवसांचा प्रार्थना करार जो प्रौढांसाठी आहे, तो माझे जीवन बदलत आहे. आणि आता चाळीस दिवसांचा प्रार्थना करार जो बालमित्रांसाठी तयार होत आहे, तो मी वापरण्यात अतिशय उत्सुक आहे. त्यामुळे माझ्या जीवनात जी मुले आहेत. त्यांनी त्यांच्या अंत:करणात देवाचे वचन मागावे, आणि दैनंदीन प्रार्थनेला समर्पण करावे, ह्यासाठी मी त्यांना प्रोत्साहित करण्यास उत्सुक आहे. एकत्र प्रवास करण्यासाठी हे किती तरी सुंदर साधन आहे.

– बिक बोसवेल, एस आय एल इंटरनॅशनल, इंटरमिशन ग्लोबल, प्रेयर कोर्डीनेटर.

प्रार्थना करणाऱ्या लेकरांच्या मनात आधिपासूनच लागलेल्या आत्म्याच्या अग्नीला चेतवण्यास बालमित्रांसाठी प्रार्थनेच्या कराराचे सामर्थ्य हा एक वेळेवर उपलब्ध झालेले साधन आहे.

– आयरमा चॉन, डायरेक्टर ऑफ चिल्ड्रेन इन प्रेयर, चिल्ड्रेनस पास्टर

प्रार्थनेच्या कार्याद्वारे ख्रिस्ताचे राज्य पुढे वाढवण्याचे मिशन कार्यात लेकरांची अंत:करणे ही जोडावीत हे मोठे धाडसी आव्हान, बालमित्रांसाठी प्रार्थनेच्या कराराचे सामर्थ्य हे ह्या द्वारे पूर्ण होत आहे. कॅण्डी तू इतके महत्वपूर्ण प्रभावी साधन उपलब्ध केले त्याबद्दल मी तुझे आभार मानते.

– गॅरी एल.फॉस्ट, व्हाइस प्रेसिंडेट,मिड वेस्ट रिजन अँड प्रेयर नॉर्थ अमेरिकन मिशन बोर्ड

बालमित्रांसाठी प्रार्थनेच्या कराराचे सामर्थ्य अद्भुत असे आहे. स्पष्टता, स्पष्टतेचे सामर्थ्य, सुस्पष्ट विचार आणि अत्यंत साधेपणा ह्यामुळे हे ख्रिस्ताच्या शरीरासाठी अतिशय सामर्थ्यशाली असे वरदान आहे!

ख्रिस्ताच्या गौरवासाठी तळमळीने प्रार्थना करणाऱ्या मुलांची नवीन पिढी ह्या पुस्तकाद्वारे तयार होईल, असा मला पूर्ण विश्वास आहे. ही पिढी देवाच्या वचनामध्ये पूर्णपणे मुळावलेली, आणि ख्रिस्ताच्या गौरवासाठी अभिषिक्त सेवेत बाहेर पडणारी अशी असणार आहे! आणि एक पिता म्हणून मी हे पुस्तक तुम्हांला नक्किच सुचवेल.

चला! आपण ख्रिस्ताच्या संगती त्याच्या मागे चालु या आणि प्रार्थनेत वेळ घालू या.

– डॉ. जॅसन हर्बड,डायरेक्टर आफ लाईट ऑफ द वर्ल्ड प्रेयर सेंटर.

हे पुस्तक अतिशय सुंदर रितीने मांडलेले, व लिहिलेले बालमित्रांसाठी प्रार्थना मार्गदर्शित आहे, मग ही मुले संपूर्ण जगात मंडळ्यांमध्ये व शाळेमध्ये व कुटूंबामध्ये आहे. हे पुस्तक व्यवहारिक आणि लक्ष वेधून घेणारे आहे.

–रॉर्बटए.मॅकडोनॉल्ड, रिटायर चेयरमॅन,प्रेसिडेंट ऑफ चिफ एग्झिकेटिव्ह ऑफ द प्रॉक्टर अँड गॅम्बल कंम्पनि.

प्रतिक्रिया

बालमित्रांसाठी प्रार्थना कराराचे सामर्थ्य हे पुस्तक माझ्या घरात अगोदरच लागलेल्या अग्नीला अधिक चेतवणार आहे. हे पुस्तक माझ्या कुटूंबामध्ये, आणि इतरांच्या जीवनामध्ये तयार करणाऱ्या चळवळीला पाहण्यास मी आतुर झालो आहे. ह्या पुस्तकांमधून अनेक मुलांच्या जीवनात प्रार्थनेची शिस्त, आणि चर्चा करण्याच्या कला निर्माण होतील, त्यामुळे मी प्रेरीत होऊन इतरांना हे सांगितले व आमंत्रित केले.

– सेन् मॅकी, जी.एम./डायरेक्टर ऑफ सेल्स, लिक्स एटंरप्राइजेस अँड लिक्स केमिक्लस ऑफ डेटॉन, चार लेकरांचा पिता : स्टीफन -14, समनथा -12, स्कयालर -9, शायला -7

येणाऱ्या पिढीच्या हातात जर आपण कोणते महत्त्वाचे साधन देऊ शकतो, तर ते प्रार्थना हे होय. ख्रिस्त येशूचे आम्हावरील स्वामीत्त्व ह्या कराराच्या द्वारे आपल्या लेकरांना समजण्यास मदत होते. आमची मंडळी सुसज्ज झाली आहे. माझी लेकरे आर्शिवादित झाली आहे, आणि मला खात्री आहे की तुमचे ही लेकरे आर्शिवादित होतील.

– रेव्ह. क्रुट्स मॉक, असोसिएट पास्टर ऑफ हॅमीलटण ख्रिश्चन सेंटर

लेकरांच्या उपयोगासाठी प्रार्थना करार हे पुस्तक तयार झाले आहे, आणि त्याबद्दल मी खुप आनंदित आहे मला नक्किच खात्री आहे, की जगभरातील संपूर्ण मुलांना एक प्रार्थना पूर्ण जीवनशैली तयार करण्यासाठी प्रार्थना करार हे पुस्तक अतिशय महत्त्व साधन तयार झाले आहे. आणि म्हणून आम्ही मोठ्याने घोषणा करतो, लेकरांनो या! देवाची उपासना आणि देवाची प्रार्थना करायला शिका.

– डॉ. लोउ शिरेय,डायरेक्टर क्लर्जी डेव्हलपमेंट/प्रेयर मिनिस्ट्री,इंटरनॅशनल पेन्टीकॉस्टल होलीनेस चर्च

बालमित्रांसाठी प्रार्थनेच्या कराराचे सामर्थ्य हे पुस्तक अतिशय उत्कृष्टपणे परमेश्वराचे चरित्र वाखंडते आणि लेकरांसमोर मांडते. लेकरांची प्रिय मुले व मुली ही ओळख निर्माण करते. जे पवित्र आत्म्याच्याद्वारे पूर्ण सक्षमतेने स्वर्गाची वाणी ऐकून ती पूर्णपणे येशूच्या नावात ऐकतेमध्ये देण्यासाठी तयार होते.

– कॅटी स्टील, चिल्ड्रनस डायरेक्टर ऑफ लाईट ऑफ द वर्ल्ड प्रेयर सेंटर मेम्बंर ऑफ 4/14

लेकरांनी प्रार्थना कशी करावी, हे वाचन करण्यासाठी हे पुस्तक खुप खुप मदत करते तसेच आईवडिलांना सुद्धा आपल्या मुलांना प्रार्थनेत शिष्य कसे बनावे, हे शिकवण्यास सहकार्य करते. प्रार्थना करावयाच्या प्रौढांसाठीच्या पुस्तकाच्या हे अगदी तंतोतंत जवळ तयार केले असल्यामुळे ते कुटूंबीयांना आणि एकमेकांसोबत प्रार्थना करण्यास आणि प्रार्थनेची ही चळचळ आपल्या स्थानीक समाजापर्यंत नेण्यासाठी नक्किच सहकार्य करणारी असेल.

– फॉर्ड टायलॉर, एफ.एस.एच.ग्रुप / ट्रान्सफॉरमेशनल लिडरशिप

प्रतिक्रिया

प्रार्थनेची आवश्यकता, प्रार्थनेचे सामर्थ्य, आणि प्रार्थना कशी करावी हे लेकरांना जर शिकवण्यात आले, तर त्यांचे जीवन किती अद्भुत रितीने बदलेल! प्रार्थनेच्या व्यतिरीक्त महत्त्वाचे हे पुस्तक मुलांना देवाचे त्यांच्या विषयीचे प्रेम आणि त्याच्या आज्ञांचे पालन करण्याचे महत्त्व देखील शिकवतील.

– थॉमस इ. ट्राक्स, फॉरमर जनरल सूप्रिटेंडंन्ट ऑफ द असेंब्मलि ऑफ गॉड

परमेश्वर जग बदलणाऱ्या मुलांना आणि येणाऱ्या नवीन पिढीला निर्माण करत आहे. ख्रिस्त 'स्वत:साठी आणि इतरांसाठी', दररोज ख्रिस्त केंद्रीत प्रार्थना करण्यास शिकवणे, हे बालमित्रांसाठी प्रार्थना कराराचे सामर्थ्य ह्या पुस्तकातून उपलब्ध झाले आहे. हे किती अद्भुत आहे! आणि मी तर अगदी ह्या पुस्तकाचा चाहता झालो आहे! मी माझ्या सर्व मित्रांसोबत माझ्या सर्व काम करणाऱ्यांसोबत आणि जे विशेष करून तरुण आहे, त्यांनाही हे देण्याचा विचार करत आहे.

– टॉम विक्टर, प्रेसिंडेंट, द ग्रेट कमिशन कोलेशन, फॅसिलेटर, 4-14 नॉर्थ अमेरिकन रिजन

मी तुम्हांला उत्साहित करतो की, तुम्हीही हेच करावे. आमच्या बालमित्रांमध्ये सर्वशक्तिमान देवासोबत प्रीती आणि जवळीकता निर्माण करण्यासाठी हे पुस्तक अत्यंत पवित्र असे साधन झाले आहे. मला खात्री आहे की हे पुस्तक सर्व विश्वासणाऱ्यांना प्रशिक्षित करण्यासाठी व शुभवर्तमान सांगण्यासाठी, आणि महान आज्ञा व महान आदेशाचे पूर्णपणे आज्ञेचे पालन करण्यासाठी आपल्या लेकरांना नक्किच तयार करेल. ख्रिस्ताच्या शरीरासाठी ह्या उत्तम वरदानाबद्दल आम्ही तुमचे आभार मानतो!

– के. मारर्शल विल्यम , सिनियर पास्टर, नॅझरीन बॅप्टीस्ट चर्च, फिलदेलफीया पी.ए. अँड प्रेसिंडेंट, नॅशनल आफ्रीकन अमेरिकन फेलोशिप, एस.बी.सी.

सर्मपण

जगातील सर्व लेकरांना हे पुस्तक समर्पित आहे, तुमचा स्वर्गीय पिता तुम्हावर किती प्रेम करतो ह्याच्याशी तुमची ओळख आणखी जास्त वाढेल.

माझे प्रिय पती विक आणि माझी मुले जोनाथन आणि मारिया ह्यांना, तुमच्या प्रेमाबद्दल प्रोत्साहनाबद्दल व सहकार्याबद्दल.

स्टिफन अझरे माझे सहलेखक ह्यांना, तुमचे उत्कृष्ट अनुभव मार्गदर्शन आणि समर्पण मला ह्या प्रोजेक्टवर लाभले त्याबद्दल मी तुझा ऋणी आहे.

जेरी कर्कला, जगातील मुलांना चाळीस दिवसांतील प्रार्थनेच्या कराराचे दृष्टान्त समजावे, ह्यात लाभलेल्या तुमच्या निर्विवाद सहकार्याबद्दल व तुमच्या उधार देणगीबद्दल.

बालमित्रांसाठी प्रार्थना पुस्तिका तयार करतांना, टिममध्ये असलेल्या सर्व महिलांना तुम्ही जे मार्गदर्शन व सहकार्य केले त्याबद्दल.

ऍमी क्रिक, शारोन मॅसोन, स्टीफनाई प्लॅनकोइक, शारोन स्कॅटस आणि कॅटी स्टील्.

कॅटी स्टीलची 4 /14 चळवळ व आयरमा कॉनला: त्यांचे सहकार्य आणि मार्गदर्शणासाठी

प्रस्तावना

मी गेली पंचेचाळीस वर्षाहून अधिक काळ प्रौढांसाठी लिहिण्यात आलेल्या प्रार्थना कराराच्या सेवेत सहभागी झालो आहे. मी निरंतर आनंदित होतो, की देव कसा त्याच्या सेवेला आशीर्वादित करून वाढवत आहे. परंतु बालमित्रांसाठी प्रार्थनेचा करार हे देवाने मला दिलेल्या आश्चर्यांपैकी एक आश्चर्य आहे. कॅण्डी मार्बालीने मला हा दृष्टान्त सांगितला, तोपर्यंत मला ह्याची जाणीव ही झाली नव्हती, लेकरांच्या सेवाकार्यात अतिशय उत्कृष्ट अशा लोकांचा संघ तयार करावा, असे देवाने कॅण्डीला सुचवले. कॅण्डी आणि त्याची संपूर्ण टिम ह्यांनी मुलांच्या सेवाकार्यात आपले संपूर्ण जीवन दिले होते. त्यामुळे प्रार्थनेचा करार हा मुलांच्या भाषेतही उपलब्ध व्हावा अशी त्यांची मन:पूर्वक इच्छा होती. प्रार्थनेच्या कराराचे मुलांसाठीचे संसाधन उपलब्ध केल्याबद्दल कॅण्डी आणि इतरांना ह्या हस्तपुस्तिकेची गरज दिसून आली.

बालमित्रांसाठी प्रार्थनेचा कराराचे हे साधन प्रौढांसाठीच्या संस्करणाप्रमाणेच प्रार्थनेला वाढवणारे व मार्गदर्शित करणारे आहे आणि जसे नावात आहे त्याप्रमाणेच हे पुस्तक लहान बालमित्रांसाठी लिहिण्यात आले आहे. जिथे लेकरे आहेत तिथे जाऊन हे पुस्तके त्यांची भेट घेतील, परंतु लेकरे ज्या अवस्थेत आहेत त्या अवस्थेत ते पुस्तक त्यांना सोडत नाही लेकरांच्या अध्यात्मिक वाढीसाठी अतिशय अशी सुंदर आणि छोटीक आव्हानोत्तर प्रार्थना यात दिलेली आहे.

हे पुस्तक प्रामुख्याने बालमित्रांसाठी लिहिलेले आहे परंतु मला खात्री आहे की, हे पुस्तक आईवडिलांना ही नक्किच आर्शिवादित करेल, व सुसज्ज करेल, जेणेकरून ते व आपल्या मुलांसाठी आर्शिवादाचा स्त्रोत होतील. ते सन्डे स्कुलच्या शिक्षकांना देखील आर्शिवादित करेल. आणि जेणेकरून ते बालमित्रांसाठी आर्शिवादाचे कारण बनतील संपूर्ण ख्रिस्ती शैक्षणिक प्रक्रियेला चालना देणाऱ्या बाळकांनाही हे पुस्तक आर्शिवादित करेल, अशी मला खात्री आहे.

प्रार्थना करणे हे बालमित्रांसाठी नैसर्गिक आहे. आणि आपले आईवडील ज्यांच्यावर ते भरवसा आणि विश्वास ठेवतात आणि त्यांच्या सोबत प्रार्थना करणे हे देखिल त्यांच्यासाठी नैसर्गिकच असले पाहिजे. आईवडील आणि शिक्षकांना *बालमित्रांसाठीचा प्रार्थनेचा करार* अशी चाकोरी उपलब्ध करून देते. त्यावरून ते धावू शकतात. देव आपल्याला जी प्रीती देतो, आणि शांती देतो, त्याची गरज प्रत्येक मुलाला आहे. त्यासाठी ह्या गोष्टी प्रार्थनेच्या कराराद्वारे मुलांसाठी उघडल्या जातात.

सुरुवातीला *बालमित्रांसाठी प्रार्थनेचा करार* ही एक खुप चांगली योजना वाटली परंतु आता मला पूर्ण खात्री पटली आहे की *बालमित्रांसाठीचा प्रार्थना करार* हा आमच्या नेतृत्वाने घेतलेला सर्वात महत्त्वाचा निर्णय ठरला आहे. हे पुस्तक आग पेटीची ती काडी आहे जी जगभरातील प्रार्थना कराराला पेटवणार आहे.

जेरी कर्क
फॉऊन्डर अँड प्रेसिंडट ऑफ प्रेयर कॉव्हेनंट

परिचय

आमच्याकडे एक उद्दिष्ट आहे, आणि आमची इच्छा आहे की ते उद्दिष्ट तुम्ही जाणावे!

संपूर्ण जगभरात एक अध्यात्मिक जागृती आणि यासाठी आम्ही तुम्हांला हे लिहून उत्साहित करत आहोत व तयार करत आहोत.!

दुसऱ्या शब्दात सांगायचे झाल्यास आम्हांला एक फार मोठा दृष्टान्त व विशिष्ट मिशन कार्य आहे.

दृष्टांत

बालमित्रांसाठीचा प्रार्थना करार वापरून जगभरातील मुलांनी आपला स्वर्गीय पिता ह्याच्याशी जवळीकतेचे नाते निर्माण करावे आणि ख्रिस्तासाठी इतरांना प्रभावित करावे.

प्रेरित कार्य (मिशन)

कुटूंबे, सेवाकार्ये, मंडळ्या, आणि शाळा ह्यांना बालमित्रांसाठीचा प्रार्थना करार उपयोगात आणण्याची क्षमता देऊन सुसज्ज करणे ज्यामुळे ख्रिस्त येशूला जीवनभरासाठी समर्पित होतील.

परिचय

ह्या एकविसाव्या शतकात मंडळीतील बालमित्रांमध्ये नवीन आणि उत्तेजन देणारे बदल दिसून येत आहेत. मंडळीला हे दिसून येत आहे की आज जगातील लोकसंख्येत सर्वात अधिक संख्या मुलांची व तरुणांची आहे. (1990 पासून ते आतापर्यंती जी मुले. जन्मास आली ती) यावरून आपल्या लक्षात हे येते की, बालमित्रांसाठी सेवा कार्य हे आपले प्राथमिक लक्ष्य असले पाहिजे. हे केवळ अवलोकन केल्यानेच नव्हे तर हे देवाच्या वचनांवर आधारीत देखील आहे. अगदी आरंभापासून मुले देवाच्या योजनेचा भाग आहेत. आणि ते आजही त्यात सामील आहेत.

सध्याचे *जनरेशन झेड* हे सेवाकार्यासाठी परिपक्व, कापणीसाठी तयार असे शेत आहे. संशोधनही हे सिद्ध करते की त्यांना ह्या जगावर प्रभाव पाडायचा आहे. त्यांना वस्तूंमध्ये आवड नाही परंतु त्यांना काहीतरी विशेष कार्य करून दाखवायचे आहे. आणि त्यातच त्यांना विशेष रुचि आहे. ते खरोखर तंत्रज्ञान उत्कृष्टपणे हाताळणारे आणि चोवीस तास इंटरनेटशी जोडलेले आहेत, तसेच त्यांना एक सकारात्मक बदल घडवण्याची इच्छा आहे. म्हणून कधी नव्हते इतके, हरवलेल्या आणि मरण-प्राय: जगात ख्रिस्ताचे राज्य पसरवण्यासाठी आता आपण लेकरांना सुसज्ज सक्षम करून या कामासाठी वाहवून घेण्याची गरज आहे. ह्या जगाला आशा, प्रीती आणि शांती देणाऱ्या येशूची आवश्यकता आहे. या गोष्टी केवळ तोच देवू शकतो. आम्ही विश्वास ठेवतो की *बालमित्रांसाठीचा प्रार्थना करार* हे सामर्थ्यशाली साधन ह्या पिढीच्या मुलांपर्यंत पोहंचायला मदत करेल आणि त्यांना जे सेवाकार्य पाचारण करत आहे. त्यासाठी ते सुसज्ज होतील.

जेरी कर्क, ह्यांनी ख्रिस्ताचे प्रभुत्व आणि प्रार्थना करार याविषयी 2010 मध्ये आमच्या मंडळी उपदेश केला, तेव्हा माझे पती आणि मी मंडळीतील इतर शेकडो जणांसोबत सहभागी झालो होतो. आम्ही त्यांच्या सोबत प्रार्थनेच्या करारामध्ये प्रवेश केला. आम्ही दररोज ही प्रार्थना करण्यास सुरुवात केली, आणि त्याच्या सामर्थ्याचा अनुभव घेऊ लागलो. 2013 मध्ये मी प्रार्थना करत असतांना देवाने मला बालमित्रांसाठी प्रार्थना कार्ड बनवण्याचा दृष्टांत दिला, आणि अशा रितीने बालमित्रांसाठीच्या प्रार्थना कराराचे सेवा कार्य सुरू झाले. न्यू यॉर्क शहरामधे प्रॉमीस मिनिस्ट्री येथे, *4/14 बेस्ट प्रॅक्टीसेस् कॉन्फरन्स्* चे आयोजन 2014 मध्ये करण्यात आले होते. तेथे *बालमित्रांसाठी प्रार्थना कराराचे सामर्थ्य* हे पुस्तक प्रकाशीत करण्यात आले. तेथील उपस्थितांमध्ये आफ्रिकेतून आलेल्या लोकांसोबत मी हे सेवाकार्य वाटले. आणि देवाने प्रार्थना कराराच्या सेवेचे आंतरराष्ट्रीय स्तरावरचे दार उघडले. एक महिन्यानंतर या पुस्तकाला इल्यूमिनेशन बुक अवॉर्ड 2015 यांच्या राष्ट्रीय प्रेस रिलिजमध्ये शिक्षणासाठी *गोल्ड* पुरस्कार देण्यात आला. आज या पुस्तकाचे दुसरे संस्करण आम्ही छापत आहोत आणि 40 देशांमध्ये जवळपास दहा लाखांपेक्षा ही अधिक लेकरांना ह्या द्वारे शिष्यत्त्व प्राप्त होत आहे. आमचा विश्वास आहे की, ही तर केवळ सुरूवात आहे. प्रत्येक लेकरापर्यंत या सरळ साध्या सोप्या प्रार्थनेच्या साधनाद्वारे पोहोंचले जावे हा आमचा दृष्टांत आहे. प्रार्थना करारामध्ये जे जे लोक सहभागी झाले आहेत त्यांना याचा अनुभव घेऊन सामर्थ्य आणि जीवन पालटणारे परिवर्तन अनुभवले आहे.

परिचय

प्रौढांसाठी लिहिलेल्या प्रार्थना कराराच्या प्रेरणेतून मुलांसाठी हे सोपे संस्करण निर्माण करण्याचा दृष्टान्त निर्माण झाला. हे पुस्तक सोपे आहे, परंतु त्यामध्ये कोणत्याही प्रकारे विषयामध्ये बदल करण्यात आलेला नाही. ही प्रार्थना जगभरातील सर्व मुलांना सामर्थ्य देणारी ठरली आहे. मुले जेव्हा या दहा वेगवेगळ्या विषयांमधून जातात तेव्हा ते येशूचे खरे अनुयायी बनणे म्हणजे काय याचा अर्थ समजतात. जसे जसे ते ख्रिस्ताचे चरित्र समजू लागतात, त्यामुळे ते ख्रिस्तामध्ये कोण आहेत आणि त्याचा त्यांच्यासाठी उद्देश काय आहे हे समजण्यास त्यांना सुरूवात होते. देवाचे गौरव करणे आणि त्याच्यासोबत निरंतर सान्निध्याचा आनंद घेणे हा त्यांचा उद्देश त्यांच्या लक्षात येतो. मुले येशू सोबत जेवढा अधिक वेळ घालवतील तेवढी ती अधिक त्याच्यासारखी होतील, करुणेने परिपूर्ण, प्रीतीने परिपूर्ण, दयेने परिपूर्ण, आणि क्षमाशील अशी ती होतील. ही प्रार्थना शिष्यत्त्व, परिवर्तन आणि शुभवर्तमान ह्यांना प्रेरणा देणारी अशी आहे.

चाळीस दिवस का?

ही प्रार्थना संपूर्ण जीवनभर केली जाऊ शकते, तरीही मुलांनी आपले शिक्षक, आईवडील, बहीण, किंवा भाऊ आपले पास्टर, किंवा मित्र ह्यांच्यासंगती चाळीस दिवसांच्या कालावधीत ह्या पुस्तकाद्वारे प्रार्थना करावी, हे ह्या ठिकाणी अभिप्रेत आहे. जेव्हा चाळीस दिवस पूर्ण होतील, तेव्हा ही मुले दुसऱ्या कोणालातरी ह्या प्रार्थनेसाठी आमंत्रण देऊन ही प्रार्थना पुढे चालवू शकतात आणि अशा प्रकारे ही साखळी पूढे चालत राहिल. अशा प्रकारे प्रार्थनेच्या कराराची जीवनशैली म्हणजेच एकमेकांसोबत आणि इतरांसाठी केलेली प्रार्थना ही एक जीवनशैली विकसीत होईल.

प्रत्येक ओळीसाठी आम्ही पवित्र शास्त्राचा संदर्भ का लिहिला आहे?

आपल्या प्रार्थना ह्या वचनाच्या द्वारे अधिक सक्षम आणि अधिक उत्तम होतात. येशूने म्हटले "जर तुम्ही माझ्यामध्ये राहिलात आणि मी तुमच्यामध्ये राहिलो तर मला तुम्हांला जे काही हवे ते मागा, तुम्हासाठी ते केले जाईल."

(योहान 15:7)

शास्त्र वचन पाठ करणे हे एक प्रभावी साधन आहे. एकदा पाठ केल्यानंतर ही गोष्ट लेकरांच्या जीवनात सदैव चिटकून राहिल जेवढे जास्त शास्त्र वचने ते पाठ करतील, तेवढ्या जास्त आव्हानांना आणि मोहांना सामना करण्याची क्षमता त्यांना प्राप्त होईल.

प्रार्थनेचा प्रवाह

एखाद्या व्यक्तीच्या प्रार्थना विनंत्यांची यादी म्हणजेच प्रार्थना नव्हे. प्रार्थना ही त्याहूनही फार अधिक आहे. येथे दिलेल्या प्रार्थनेतील प्रत्येक ओळ ही त्या आधी आलेल्या ओळीवरील पुढची पायरी आहे आणि त्यानंतर येणाऱ्या प्रार्थनेची पायरी म्हणून ती काम करते. प्रार्थनेच्या द्वारे स्वर्गीय पिता मुलांना आणि तरुणांना त्याचा पुत्र येशू याच्यासारखे होण्यास सहकार्य करेल. प्रार्थनेद्वारे अशी मुले तयार होतील की, जी -

- स्वर्गीय पित्याची **कृपा** स्वीकारतात,
- त्याच्या आज्ञांचे पालन म्हणून इतरांवर **प्रीती** करतात,
- जशी त्याने आम्हावर **दया** दाखवली तशी ते इतरांवर प्रीती करणारे असतील,

परिचय

- पापांचा खरोखर **पश्चाताप** करणारे,
- खरी **उपासना** करतील.
- परिणामकारक जीवन जगून, दररोज येशूच्या मागे चालण्याचे **निर्णय** करतील,
- आणि पवित्र आत्म्यावर **अवलंबून राहणारी** मुलांची पिढी तयार होईल.

ह्याचे परिणाम काय होतील,

- नितीमत्तेमध्ये इतरांवर **प्रभाव** टाकणारी मुले तयार होतील,
- ख्रिस्त येशूचे प्रौढ **शिष्य** तयार होतील,
- ख्रिस्त येशूच्या **अधिकाराखाली** जगणारे व प्रार्थना करणारे लोक तयार होतील.

ह्या पुस्तकाचा पुर्वार्ध हा केवळ बालमित्रांसाठी आहे. आमची इच्छा आहे की, त्यांनी ते वाचावे. प्रौढांनी त्यांना ते वाचून दाखवावे, चित्रांमधून त्यांना प्रेरणा प्राप्त व्हावी, वचनांनी त्यांच्या अंत:करणाचा ताबा घ्यावा, आणि प्रार्थनेने त्यांना नियंत्रित करावे अशी आमची इच्छा आहे. एकत्र प्रार्थना केल्याने, देवाच्या वचनाचे मनन केल्याने, ह्या पुस्तिकेतील प्रार्थनेच्या द्वारे उपासनेची एक पद्धत उपलब्ध केली जाते. आनंद आणि आभारी मनाने प्रत्येक दिवसाची सुरुवात होवो, आणि दिवसाचा शेवट शांती व निवांतपणे होवो हिच आमची इच्छा आहे.

पुस्तकाचा उत्तरार्ध हा केवळ प्रौढांसाठी आहे. परंतु बालमित्रांसाठीच्या चाळीस दिवसांसाठीच्या प्रार्थनेच्या कराराचे संस्करण हे इतरांना देण्यासाठी शिक्षकांनी व आईवडिलांनी त्याचा कसा उपयोग करावा, त्याविषयी विशेषतः आली आहे. ह्या पुस्तकाच्या उत्तरार्धामध्ये वचनाची अधिक काही संदर्भे दिलेली आहेत जी आपल्याला वचनाचा खोलवर अभ्यास करण्यासाठी एकमेकांना प्रोत्साहित करणारे प्रश्न, वेगळे होऊन प्रार्थना करण्याचे सत्र, पवित्र शास्त्रातील गोष्टी, वर्कशीट ज्यामध्ये लेकरांच्या प्रार्थना कराराचा रेकॉर्ड ही असेल ते इतरां संगती वापरतील आणि शेवटी असे एक गीत जे लेकरांना गाता येईल ज्यामध्ये त्यांची सृजनशिलता व उत्साह वापरता येईल ते दिलेले आहे. उत्तरार्धात दिलेले सगळे साहित्य तुम्ही मोठ्याने बोलू शकता. जसे लिहिलेले आहे तसे बोलू शकता, किंवा त्याला एक मार्गदर्शन पद लिखाण म्हणून तुम्ही त्याचा अभ्यासक्रम तयार करू शकता, यात निवड आपली आहे.

बालमित्रांसाठी प्रस्तावना

"मुलांनो, तुम्ही कसे आहात?"

चाळीस दिवसांचा प्रार्थना करार हे पुस्तक विशेषत : तुमच्यासाठी तयार केले गेले आहे. ह्याने तुमचे प्रार्थना जीवन मजबूत होईल आणि वाढेल. सामर्थ्य हा शब्द ऐकल्यानंतर सर्वात आधी तुमच्या मनात कोणता विचार येतो सुप्पर हिरोज्? प्रसिद्ध लोक? पैसा? देव? जर तुमचे उत्तर देव असेल, तर तुम्ही बरोबर उत्तर दिले आहे. देव सामर्थ्यशाली आहे!

"स्वर्गात आणि पृथ्वीवर सर्व सामर्थ्य मला देण्यात आले आहे!" (मत्तय 28:18)

आणि हे फार मोठे सामर्थ्य आहे पवित्र शास्त्र आम्हांला सांगते "देवाला काहीही अशक्य नाही." तुम्हांला हे माहीत आहे का? तुम्ही जर मागीतले तर देव हे सामर्थ्य तुम्हांला देतो. येशूने म्हटले, "तुम्ही जर माझ्या नावात काहीही मागाल तर ते मी तुम्हासाठी करेल." वॉव! प्रार्थनेत सामर्थ्य आहे. आणि हे सामर्थ्य येशूच्या नावात आहे? होय! आणि तुम्ही मला फक्त काय करायचे आहे तर मागायचे आहे! येशूने म्हटले, "तुम्ही मागा म्हणजे तुम्हांला मिळेल आणि तुमचा आनंद परिपूर्ण होईल." प्रार्थना म्हणजे जग, भौतिक गोष्टी मागणे, किंवा आपल्या इच्छा पूर्ण होने नव्हे. तर देवाला प्रीती, विश्वास, धैर्य, मार्गदर्शन आणि शक्ती मागने, हे होय. देवाला त्याच्या इच्छेप्रमाणे तुम्हांला बनवावे आणि त्याच्या सारखे बनवावे, ही विनंती म्हणजे प्रार्थना होय. येशूला तुमच्या पापांची क्षमा करण्यास विनंती करणे. तुम्हांला पवित्र आत्म्याने भरावे, आणि इतरांच्यासाठी तुम्ही प्रार्थना करता, तेव्हा त्याच्या गौरवाने उत्तम गोष्टी व्हाव्या अशी विनंती करणे, म्हणजे प्रार्थना होय. येशू तुमच्यावर वैयक्तिकरित्या व पूर्णपणे प्रीती करतो, तुम्ही दिवसभराच्या कामावरून घरी आल्यावर तुमचा दिवस कसा गेला, हे ऐकल्याने तुमचे आईवडील आनंदित होतात. तसेच तुमचा स्वर्गीय पिता ही तुमच्याकडून तुम्ही कशाबद्दल आभारी आहे. कुठल्या गोष्टींचा तुम्हांला त्रास होतो, तुमचा दिवस कसा गेला, हे ऐकून आनंदित होतो.

प्रार्थना महत्त्वाची आहे, आणि ती नक्किच आनंददायी असू शकते, येशू ख्रिस्तासंगती प्रार्थनेत आणि त्याच्या वचनात वेळ घालवणे हे सर्व जगातील अतिशय आनंद देणारे कार्य आहे, हे तुम्हांला लवकरच समजेल. तुम्ही जी प्रार्थना करतात त्या प्रत्येक प्रार्थनेसाठी वचनातील संदर्भ घेऊन एक वचन लिहिले आहे. पवित्र शास्त्रातील वचने आम्ही तुमच्या प्रत्येक प्रार्थनेच्या ओळीसंगती दिलेली आहेत.

येशू म्हणाला, "जो माझ्यावर प्रीती करतो, तो माझ्या आज्ञा पाळतो,आणि पिता त्याच्यावर प्रीती करेल, आणि आम्ही दोघे त्याच्यासोबत राहू". आणि हे एक विशेष असे अभिवचन आहे.

प्रार्थना खरोखर महत्त्वाची आहे. जेवढी जास्त तुम्ही प्रार्थना कराल, तेवढेच तुम्ही त्याच्या दयेत व त्याच्या ज्ञानेत वाढाल, आणि अधिकाधिक येशू सारखे व्हाल. पवित्र आत्म्याची फळांचा तुम्ही अनुभव घ्याल.

"प्रीती, आनंद, शांती, सौम्यता, धैर्य, दयाळूपणा, चांगुलपणा, विश्वासूपणा आणि इंद्रिय दमन" हे येशूला आनंदित करते.

तुम्ही आपले आईवडील, बहीण, भाऊ किंवा आजी-आजोबा आणि मित्र ह्याच्यांसंगती हे पुस्तक वाचण्यात व प्रार्थना करण्यात वेळ घालवाल व त्या वेळेचा आनंद घ्याल. हे पुस्तक त्यात सहकार्य करेल, अशी आशा आम्ही बाळगतो.

तुम्ही कधी विसरू नये असे अभिवचन आम्ही तुम्हांला सांगतो तुमच्यावर प्रीती करतो, त्याची प्रीती कधीही संपत नाही. आणि सदासर्वकाळ त्याची प्रीती तुम्हासंगती आहे.

बालमित्रांसाठी प्रस्तावना

"करार काय आहे"?

आता तुम्हांला आश्चर्य वाटत असेल, "करार म्हणजे काय?" करार म्हणजे दोन किंवा जास्त लोकांमध्ये दिलेले अभिवचन. आपण प्रथम प्रार्थनेने सुरुवात करू या, आपल्या स्वतः करिता ही प्रार्थना दररोज करा किंवा आपण ही प्रार्थना करण्यासाठी दुसरा व्यक्ती निवडू शकतो. जर आपण एकटे सुरु करतो, खात्रीने लवकरच तुमच्या सोबत एखाद्याला सहभागी करण्यासाठी निवडा. तुम्ही आपले आई-वडील, बहिण-भाऊ, आजी-आजोबा, किंवा मित्रांबरोबर 40 दिवसांकरिता करार करण्यासाठी निवडू शकता. 40 ह्या अंकाचा उपयोग पवित्रशास्त्रात बऱ्याचवेळा केला आहे. आपण त्याचा उल्लेख ज्यामध्ये आहे, अशा पवित्रशास्त्रातील काही अध्यायांचा विचार करू शकता का? ही वचने तपासा : उत्पत्ती 7:12, निर्गम 34:28, मत्तय 4:2. आपण एका व्यक्तीसाठी प्रार्थना करणार, आणि तो व्यक्ती आपल्यासाठी प्रार्थना करणार, आणि ते ही 40 दिवसासाठी, हे कशा रीतीने कार्य करित आहे. आपण करार करण्याकरिता एखाद्या नविन व्यक्तीला 40 दिवस पूर्ण होतात तेव्हा आंमत्रण देऊ शकतो

40 दिवस का ?

आपल्याला दुसऱ्यासाठी 40 दिवस प्रार्थना केल्याने त्यांच्या विषयी काळजी आणि प्रेम व्यक्त करण्याचा हा एक व्यवस्थित मार्ग आहे. आणि लक्षात ठेवा. तुम्ही जे बोलता ते येशूला ऐकायला आवडते. आपण दररोज त्याच्या सोबत वेळ घालवावा अशी त्याची इच्छा आहे. येशूबरोबर वेळ घालवणे हे मजेदार आहे ! आणि येशूला अनुसरणे हेही मजेदार आहे !

मी कोणाला मागावे?

बालमित्रांसाठी!

40 दिवसांचा

प्रार्थना करार

प्रिय स्वर्गिय बापा,

तू माझ्यावर प्रीती केली आहे.

आणि मला देखील आपल्या मुलांपैकी एक
बनवल्याबद्दल मी तुझा आभारी आहे.

तुझ्या आज्ञा पाळण्यास आणि तुझ्यावर
प्रेम करण्यास मला मदत कर.

जशी तू माझ्यावर प्रीती केली

तशी इतरांवर प्रीती करण्यास
मला सहाय्य कर

येशू तू माझा प्रभू आहे,
म्हणून मी तुझ्या मागे चालु इच्छितो.

मला तुझ्या पवित्र आत्म्याने भर

मला तुझी कृपा, सत्य व न्यायाचे साधन बनव.

मला तुझ्या गौरवासाठी उपयोगात आण आणि
इतरांनाही तुझ्या मागे चालावे असे आमंत्रण देण्यासाठी
माझा उपयोग कर.

येशूच्या नावात मी प्रार्थना करतो आमेन.

कृपा

हे स्वर्गीय पित्या,
तू माझ्यावर प्रीती केली आहे. आणि मला
देखील आपल्या मुलांपैकी एक
बनवल्याबद्दल मी तुझा आभारी आहे.

“मेढंपाळ आणि त्याचे हरवलेले मेंढरू” • लुक 15:1-7

मग येशूने उत्तर दिले, "तू माझे अती
मौल्यवान मुल आहेस, मी तुझ्यावर
सार्वकालिक प्रीती केली आहे."



1 योहान 3 :1

आपल्याला देवाची मुले हे नाव मिळाले आहे यात पित्याचे केवढे महान प्रितीदान आहे.

प्रीती

तुझ्या आज्ञा पाळण्यास आणि तुझ्यावर प्रेम करण्यास मला मदत कर.



अब्रहामाची गोष्ट • उत्पति 12:1-15

मग येशूने उत्तर दिले,
“तुम्ही माझ्या शिक्षणाचे पालन
करावे अशी माझी इच्छा आहे. जर तुम्ही माझ्यावर
प्रिती करता, तर तुम्ही माझ्या आज्ञा पाळा.”



मत्तय 22:37, 38

आपला देव परमेश्वर याच्यांवर पूर्ण अंतकरणाने, पूर्ण जिवाने व पूर्ण मनाने प्रीती कर कारण, ही सर्वात मोठी आज्ञा आहे..

दया

जशी तू माझ्यावर प्रीती केली, तशी इतरांवर प्रीती करण्यास मला सहाय्य कर.



चांगला शमरोनी • लुक 10:25-37

येशूने उत्तर दिले,

मी तुमच्यावर किती प्रेम करतो हे तुम्हांला समजले म्हणजे तुम्ही इतरांवर प्रीती करण्यास सक्षम व्हाल. तुमच्या अवतीभवती असलेले दु:खी, गरजू आणि आजारी लोकांसाठी प्रार्थना करून तुम्ही त्यांना माझी प्रीती प्रदर्शित करा.

योहान 15:12

जशी मी तुमच्या वर प्रीती केली तशी तुम्ही एकमेकांवर प्रीती करा, ही माझी आज्ञा आहे.

पश्चाताप

माझ्या पापांची मला क्षमा कर,
मला धुऊन शुध्द कर.



क्षमा न करणाऱ्या सेवकाची गोष्ट • मत्तीय 18:21-35

मग येशूने उत्तर दिले:

"भिऊ नका! मी तुमच्या पापांची क्षमा करील. मी तुम्हांला बर्फाहूनही शुभ्र करेल परंतु तुम्ही जशी मी तुम्हांला क्षमा केली आहे. तशीच इतरांनाही क्षमा करण्यास नेहमी तयार असले पाहिजे."

स्तोत्रसंहिता 51:2

माझा अधर्म तू पूर्णपणे धुऊन काढ आणि माझ्या पापांपासून मला शुध्द कर

उपासना

मी पूर्ण मनाने तु
झे गौरव करील.

नाताळाची गोष्ट • लुक 1 आणि 2

येशू ने उत्तर दिले

"तुम्ही माझे स्तुतीचे गीत गाता माझी उपासना करता तेव्हा ते ऐकने मला खूप छान वाटते. तुम्ही हे नेहमी करावे. तुमचे हृदय धन्यवादित असेल तेव्हा मला आनंद होतो."

स्तोत्रसंहीता 9:1

हे देवा मी माझ्या पूर्ण अंत:करणाने तुझी स्तुती करीन, मी तुझी अद्भुत कृत्ये सर्वांना सांगीन.

निर्णय

येशू तू माझा
प्रभू आहे, म्हणून
मी तुझ्या मागे
चालु इच्छितो.



पेत्र हा परिपूर्ण नव्हता • लुक 22:54-62

मग येशूने उत्तर दिले,

“मी तुमचा शिक्षक आहे. तुम्ही मला अनुसरावे अशी माझी इच्छा आहे. तुम्ही ज्या मार्गाने चालणार तो मार्ग सदैव स्पष्ट किंवा सोपा नसेल. परंतु माझ्यावर भरोसा ठेवा. मी तुम्हांला मार्गदर्शन करेल.”

योहान 13:13

तुम्ही मला गुरू व प्रभू म्हणून ओळखतात
तुम्ही ते योग्यच करता, मी तोच आहे.

अवलंबून राहणे

मला तुझ्या पवित्र
आत्म्याने भर.

सांत्वनदाता • योहान 14:15-31

येशू ने उत्तर दिले,

“लक्षात ठेवा तुम्ही कधीही एकटे नाहीत. मी नेहमी तुम्हाबरोबर असेल. मी तुम्हांला माझा आत्मा सांत्वन देणारा म्हणून पाठवला आहे. तो तुमचा शिक्षक व तुमचा मार्गदर्शक आहे.”



इफिस 5:18

आत्म्याने पूर्ण व्हा.

प्रभाव

मला तुझ्या कृपेचे, सत्याचे व
न्यायीपणाचे साधन बनव.

तुमच्यासारख्या बालमित्रांसोबत येशू. • मत्तय 18:1-6

आणि येशूने उत्तर दिले,

“तुम्ही माझ्या नजरेत फार महत्त्वाचे आहात आणि देवाच्या राज्यासाठी विशेष आहात. मी तुम्हांला मोठ्या गोष्टी करण्यासाठी उपयोग करीन”



योहान 1:14

आम्ही त्याचे तेज पाहिले आहे, एकुलता एक पुत्र, जो पित्याकडून आला, त्याच्यासारखा कृपा व सत्कर्मांनी परीपूर्ण असा तो होता.

शिष्यत्त्व

मला तुझ्या गौरवासाठी उपयोगात आण आणि इतरांनाही तुझ्या मागे चालावे, असे आमंत्रण देण्यासाठी माझा उपयोग कर.

तार्ससचा शौल, येशू ख्रिस्ताचा प्रेषित पौल बनतो. • प्रेषित 9:1-22

आणि येशूने उत्तर दिले,

“तुम्ही तुमच्या मित्रांसोबत आणि तुमच्या कुटुंबासोबत माझ्याविषयी चर्चा करा, माझे अनुसरण करण्यासाठी त्यांना तुम्ही आमंत्रण द्या.”

मतय 28:19

म्हणून जा आणि संपूर्ण राष्ट्रतील लोकांना माझे शिष्य बनवा. त्यांना पित्याच्या, पुत्राचा आणि पवित्र आत्म्याच्या नावाने बाप्तिस्मा द्या.

अधिकार

येशूच्या नावात मी प्रार्थना करतो आमेन

अंधळा बार्थीमस. • मार्क 10:46-52

आणि येशूने उत्तर दिले,

“स्वर्गात आणि पृथ्वीवर सर्व अधिकार मला देण्यात आला आहे. माझ्यामध्ये तुम्हांला आनंद, शांती, क्षमा, आशा आणि सुरक्षीतता लाभेल. ”

फिलीप्प 2:9

म्हणून देवाने त्याला सर्वोच्च स्थानित उंचावले आणि सर्व नावाहून थोर असे नाव त्याला दिले.

बालमित्रांसाठीच्या

प्रार्थनेच्या कराराचे सामर्थ्य



शिक्षकांचा विभाग

चला सुरुवात करू या.

बालमित्रांसाठीचा 40 दिवसांचा प्रार्थना करार अभ्यासक्रम हा प्रार्थना करण्यासाठी एका नतंर एक ओळीमध्ये दिलेली अभ्यास मार्गदर्शिका आहे. या संपूर्ण हस्तपुस्तिकेतील प्रत्येक पाठात तुम्हांला खालील भाग आढळतील

1

तुम्ही हे बोलु शकता का?

येथे लेकरांना पाठ करण्याचे वचन प्रस्तुत केले जाते. तुम्ही लेकरांना येथे प्रार्थनेत आणि पाठंतराच्या वचनात घेऊन चला त्यांच्याकडून ते पुन्हा पुन्हा म्हणून घ्या, दोन चार दा असे करा.

2

तुम्ही हे शोधू शकता का?

हा विषय अधिक अभ्यासण्यासाठी शास्त्रलेखाचे सदंर्भ येथे दिले आहे. या विषयावर अधिक अभ्यास करण्यासाठी काही शास्त्रभागाचे आणखी काही संदर्भ येथे पुरवण्यात आले आहे. मुले वर्गामध्ये ते पाहू शकतात, एका मागून एक आळी पाळिने शास्त्रभाग मोठयाने वाचू शकतात, आणि तो शास्त्रभाग त्यांना काय शिकवत आहे असे त्यांना वाटते, त्या विषयी ते चर्चा करू शकतात.



3

तुम्हांला हे जाणवते का?

प्रश्न विचारने लेकरांना खुप आवडते आणि आता येथे त्यांना ती संधी आहे येथे ते आपल्या कोणत्याही प्रश्नाला, भीती, शंका आणि या विषयी त्यांना काय वाटते ते येथे मोकळ्या मनाने बोलु शकतात सांगु शकतात.

4

पॉपकॉर्न प्रार्थना

लेकरांनी प्रार्थना व्यक्तिकरित्या अनुभवता यावी म्हणून हा त्यांचा एकांताचा वेळ आहे. जर वर्गातील मुलांची संख्या कमी असेल तर मुलांनी गोल उभे राहू शकतात, आणि 'पॉपकॉन प्रार्थना करू शकतात. किंवा एका ओळीची प्रार्थना जसे त्यांना सुचते तसे ते करू शकतात. प्रार्थनेची जी ओळ तुम्हांला दिली आहे त्याने त्या वेळेची सुरुवात करून तुम्ही इतरांना तुमच्या मागे ते बोलण्यास ते लावु शकतात. छोट्या गटांमध्ये एखाद्या टेबलच्या भोवती, जमिनीवर बसून, जगाच्या नकाशावर हात ठेऊन किंवा पृथ्वीच्या जो गोल आहे त्यावर हात ठेऊन ही प्रार्थना करता येते. प्रार्थना करणे सोपे आहे. मजेशीर आहे ते एकत्र करण्यात खुप मजा येते. हे लेकरांना शिकवण्यासाठी या द्वारे मदत होईल.

चला सुरुवात करू या.

5

चला बोलू या !

या विभागामध्ये काही खोलवर चर्चा करण्यासाठी सुरुवातीलाच संभाषण आणि विचारांची देवाण घेवाण कशी करावी ते येथे दिलेले आहे.

7

तुम्ही हे करू शकता का?

ह्या सत्राचे लागुकरण करण्याचा हा विभाग आहे. येथे मुलांना दिलेल्या, त्यांच्या समोर प्रस्तुत केलेल्या आव्हानांवर आणि उपदेशावर गहन विचार आणि चर्चा करावी.

9

हे “स्फुर्ती गीत” आहे!

हा सर्वोत्तम भाग शेवटी ठेवलेला आहे या सत्रातील तो कृतीचा भाग आहे. काळ्या रंगात लिहिलेले शब्द मुले वाचतात आणि मुले निळ्या शब्दांना पहिले वाचतात. त्यांनी जो पाठ शिकला त्यावर त्यांनी स्वताःच्या शब्दात एखादे छोटेशे गीत किंवा कविता किंवा स्फुर्ती गीत तयार करण्याची त्यांना परवानगी द्या म्हणजे त्यांच्या सृजनशीलतेला चालना मिळेल. त्यांच्या कल्पनांना फळ्यावर लिहून घ्या आणि ऐका. जसे जसे ते स्फुर्ती गीत गातात आणि जी ऊर्जा निर्माण होते ती तुम्ही अनुभवा. तुम्ही दुसऱ्यांदा त्या गाण्याचा वेग वाढवू शकतात. तुम्ही हे सत्र संपतांना या स्फुर्ती गीत गीतांचा आनंद घेऊ शकता.

6

तुम्ही हे ऐकू शकता का?

येथे बालमित्रांसाठी पुरवलेली बायबलमधली गोष्ट वाचून दाखवा, किंवा ती आपल्या शब्दामध्ये त्यांना सांगा.

8

वर्कशीट

प्रत्येक पाठा सोबत रंगीबेरंगी वर्कशीट दिलेली आहे. त्याने वर्गातील वेळ अधिक उपयोगी होईल व मुले काय शिकलीत ते त्यांना उजळणी करण्यास मदत होईल. मुलांनी कोणासोबत करार केला आहे त्यांच्या नावाची नोंद लिहण्यासाठी प्रार्थना नोंद करार नोंद म्हणून पुस्तकाच्या शेवटी जागा दिली आहे. तुम्ही ते कराराचे पत्र (www.the40dayprayer.org) वर ऑडर करू शकतात.

कृपा

तुम्ही हे बोलु शकता का?

हे स्वर्गीय पित्या, तू माझ्यावर प्रीती केली आहे. आणि मला देखील आपल्या मुलांपै की एक बनवल्याबद्दल मी तुझा आभारी आहे.

1 योहान 3:1
आपल्याला देवाची मुले हे नाव मिळाले आहे. यात पित्याचे केवढे महान प्रीतीदान आहे.!

तुम्ही हे शोधू शकता का?

योहान 3:16

1 योहान 4:10

रोमकरास पत्र 8:38-39

तुम्हांला हे जाणवते का?

देव आम्हावर प्रीती करतो हे आम्हाला कसे कळेल?

तुम्ही आपली प्रीती कशी प्रकट करता?

आम्ही काय केल्याने त्याची मुले होतो?

माझ्यावर कोणीतरी प्रीती करते हे तुम्हांला कसे जाणवते?

कृपा



“पॉपकॉर्न प्रार्थना” एकांताचे सत्र

स्वर्गीय पित्या तू माझ्यावर प्रीती केल्याबद्दल आणि तुझ्या मुलांपैकी एक बनवल्याबद्दल मी तुझे आभार मानतो. असे म्हणून तुम्ही सुरुवात करा, मुलांनी तुमच्यामागे ही ओळ म्हणावी, आणि मग तुम्ही त्यांना एकामागून एका एका ओळीची प्रार्थना करण्यास सांगा, ते देवाचे मुल झाले आहेत, म्हणून त्यांना कसे वाटते, देवाची सार्वकालिक प्रीतीचा त्यांना काय बोध होतो त्याच्या प्रीतीबद्दल त्यांनी आभार मानावे अशा प्रकारच्या प्रार्थना त्यांना एका एका ओळीत करू द्या, जर तुमचा वर्ग लहान असेल जर तुमच्या वर्गात कमी मुले असतील तर तुम्ही या वेळेस एक वर्तुळ करून एकमेकांचे हात धरून प्रत्येक मुलाला जसे वाटते तसे प्रार्थना करावयास मार्गदर्शन करू शकता.

चला बोलू या!

- आपल्यावर कोणी प्रीती करावी अशा योग्यतेचे होण्यासाठी आपण काहीही केले नसतांनाही त्या प्रीतीचा आपण अनुभव घेतो यालाच कृपा असे म्हणतात.
- देवाने आम्हांला निर्माण केले आहे, तो आम्हांला पुरवठा करतो, त्याने आपला एकूलता एक पुत्र येशू याला आपल्यासाठी पाठवले आहे यावरून आपल्याला कळते की देव आपल्यावर प्रीती करतो.
- सार्वकालिक प्रीती त्याचा अर्थ काय आहे हे तुम्हांला ठाऊक आहे काय? त्याचा अर्थ आहे की प्रेम प्रीती कधीही संपणार नाही.
- तुम्ही चुकीचे काहीतरी केले तरीही ती प्रीती संपणार नाही.
- जर तुम्ही घाबरले तरीही ही प्रीती संपणार नाही.
- तुम्ही ज्यांच्यावर प्रीती करता ते जरी मरण पावले, तरीही ती प्रीती संपणार नाही
- तुमच्या आई-वडिलांना कामावरून काढून टाकले, तरी ती प्रीती संपणार नाही
- तुम्हांला शाळेतील परीक्षेत कमी गुण मिळाले तरी ती प्रीती संपणार नाही
- तुमच्यासंगती काहीही घडले तरीही येशूची तुमच्यावरील प्रीती कधीच कधीच संपणार नाही

देवाच्या प्रीतीविषयी मुलांनी आपल्या मनातील विचार मोकळेपणाने मांडावे असे करा : देवाची प्रीती गमावण्याविषयीची भीती किंवा काळजी व त्या प्रीतीचा अनुभव घेण्याचा आनंद याविषयी त्यांना सांगु द्या.

कृपा

तुम्ही हे ऐकू शकता का?

हरवलेले मेंढराची गोष्ट (लुक 15:1-7)

देव प्रत्येकावर किती प्रीती करतो, हे त्यांना समजावे अशी येशूची इच्छा होती. एक मेंढपाळ आणि त्याचे हरवलेले मेंढरू याची गोष्ट त्याने त्यांना सांगितली.हरवलेल्या मेंढराची त्या मेंढपाळाला खुप काळजी वाटली. म्हणून इतर मेंढरांना सोडून तो ह्या हरवलेल्या मेंढराचा शोध करण्यासाठी गेला. कारण त्याची इच्छा होती की, ते हरवलेले मेंढरू सुरक्षित असावे. मेंढरे स्वतःला मदत करू शकत नाहीत. आणि कधी – कधी ते आपला मार्गावरून भटकतात, आणि हरवतात तेव्हा त्यांना अस्वल किंवा सिंह त्यांच्यावर हल्ला करून त्यांना खाऊ शकतो. मेंढरांना सर्व धोक्यांपासून सुरक्षित ठेवणे ही मेंढपाळाची जबाबदारी आहे. आणि त्या मेंढपाळाने तेच केले. मेंढपाळाला जेव्हा त्याचे हरवलेले मेंढरू सापडले, तेव्हा तो खूप आनंदित झाला. त्याने ते हरवलेले मेंढरू सापडल्या नंतर आपल्या खांद्यावर घेतले आणि घरापर्यंत घेऊन आला. येशू म्हणतो, "जेव्हा एखादा मुलगा किंवा एखादी मुलगी येशूला आपला तारणारा म्हणून स्वीकारते तेव्हा हे घडते – आधी ते हरवलेले असतात, आणि मग ते सापडतात त्यामुळे मोठा आनंद उत्साह आणि स्वर्गामध्ये मोठा उत्सव होतो". सफन्या 3:17 स्वर्गीयपित्याला त्याच्या मुलांविषयी किती प्रीती आहे. हे समजावून सांगते. सर्वसामान्याचे देव तारण करेल: तो तुम्हावर प्रसंन्नतेने आनंद करेल, तो आपल्या प्रीतीने तुम्हांला शांत करेल, तो तुम्हावर आनंदाने गीत गाऊन प्रसन्न असेल." हे ऐकल्याने तुम्हांला कसे वाटते.

तुम्ही हे करू शकता का?

- येशू तुमच्या पापांसाठी मरण पावला आणि तो तुमच्या अंत:करणात राहतो.
- त्याच्या कृपेने तुम्ही आता त्याचे प्रिय मुल झाले आहात ह्यावर विश्वास ठेवा
- काहीही घडले तरी त्याचे प्रेम तुम्हासाठी कधीही संपणार नाही हा विश्वास ठेवा .
- आज कोणालातरी तुम्ही त्याच्या दयेचा करुणेचा कृपेचा संदेश द्यावा म्हणून देव तुमचा उपयोग करून घेणार आहे हा विश्वास ठेवा.

कृपा

वर्कशीट

1. कृपेविषयीच्या प्रार्थनेची पहिली ओळ तुम्हांला आठवते का? तुम्ही ती येथे खाली लिहा.

2. रिकाम्या जागा भरा

   1 योहान 3:1 आपल्याला देवाची_____हे_____ह्यात_____आपल्याला केवढे_____आहे ते पाहा.

3. तुम्ही देवाचे सदासर्वकाळाचे मुलं कसे होऊ शकता?

4. तुमच्या आई वडिलांप्रमाणे येशू ही तुम्हांला नावाने ओळखतो. आणि तुमच्याविषयी त्याला सर्व काही माहीत आहे?हे ऐकून तुम्हांला कसे वाटते, हे तुम्ही एखादे वाक्य किंवा एखादे चित्र काढून दाखवू शकता का?

5. प्रतिक्रियाची वेळ

   आभारी असणे चागंले आहे येशूला ते आवडते. तुम्ही येशूसाठी एक, “धन्यवादाची ओळ लिहू शकता का?

   प्रतिक्रिया

कृपा

हे आहे

मी तर आहे राजांच्या राजाचा मुलगा

आहे! मी आहे!

सर्वकाळाकरिता मी त्याची किमती मालमत्ता आहे

आहे! मी आहे!

मी त्याच्या कृपेने तारल्या गेलो, त्याच्या रक्ताने खंडणी भरण्यात आली

आहे ! मी आहे!

मी त्याच्या पखांखाली झाकलेला आहे म्हणून नुकसानापासून सुरक्षित आहे,

आहे !मी आहे!

त्याचे माझ्यावरील प्रेम कधीच-कधीच संपणार नाही. म्हणून मी त्याचा आभारी आहे,

आहे ! मी आहे!

मी सर्वोच्च देवाचे लेकरू आहे

आमेन!

शिक्षक पहिल्याने काळ्या रंगातील शब्द वाचतील आणि मुले निळ्या रंगातील शब्द वाचून प्रतिसाद देतील. त्यानतंर तुमच्या वर्गाने एकत्रितपणे असेच एखादे गीत लिहावे म्हणून त्यांना उत्साहित करा आणि त्यांनी दिलेली, लिहिलेली, बोललेली कल्पना तुम्ही फळ्यावर लिहा. त्यांनी जे गीत लिहिले ते गीत मिळून गातांना कशी ऊर्जा निर्माण होते त्याचे निरीक्षण करा.

प्रीती

तुम्ही हे बोलु शकता का?

तुझ्यावर प्रीती करण्यास, आणि तुझ्या आज्ञांचे पालन करण्यास मला मदत कर.

मत्तय 22:37:38

आपला देव परमेश्वर याच्यावर पूर्ण अंतःकरणाने, पूर्ण जिवाने व पूर्ण मनाने प्रीती कर, कारण ही सर्वात मोठी आज्ञा आहे.

तुम्ही हे शोधू शकता का?

अनुवाद 7:9

योहान 14:15

2 योहान 1:6

कलस्सै 3:20

तुम्हांला हे जाणवते का?

आज्ञाधारकपणा म्हणजे काय?

आज्ञाधारकपणापेक्षा प्रीती महत्त्वाची आहे काय?

प्रीती आज्ञाधारकपणाशी संलग्न का आहे?

प्रीती



“पॉपकॉर्न प्रार्थना” एकांताचे सत्र

मुलांना पुन्हा एकदा प्रार्थनेमध्ये घेऊन जा. “तुझ्यावर प्रीती करण्यास आणि तुझ्या आज्ञांचे पालन करण्यास मला मदत कर.” ही प्रार्थना त्यांच्यासोबत करा. मुलांकडून ती प्रार्थना तुमच्यानंतर म्हणवून घ्या. पुन्हा पुन्हा म्हणवून घ्या. मुलांनी त्यांच्या स्वत:च्या शब्दामध्ये देवाने त्यांच्यावर प्रीती करण्यास आणि त्याच्या आज्ञाचे पालन करण्यास त्यांना शिकवावे अशी एक एका ओळिची प्रार्थना करण्यासाठी त्यांना उत्साहित करा उत्तेजन द्या.

चला बोलू या!

- आपण आपल्या देवाच्या आज्ञा पाळाव्यात अशी त्याची इच्छा आहे.
- आपल्याला त्याची आज्ञा पाळावी अशी येशूची इच्छा आहे. यामुळे त्याला आनंद होतो
- सर्व बाबतीत सर्व गोष्टीमध्ये देवाच्या आज्ञा पाळून, आपण आपली देवावरील प्रीती प्रकट करतो.
- तुम्हांला आता जी गोष्ट सांगण्यात येणार, त्याचे आज्ञापालन केल्याने आर्शीवाद येतात. हे शिकायला मिळेल.
- येशूचे अनुसरण करने आणि त्याच्या आज्ञांचे पालन करने हा प्रवास फार उत्कंठवर्धक आहे.

आज्ञा पालनाविषयीच्या चर्चेला या ठिकाणी तुम्ही सुरुवात करू शकता. आपण आपल्या आई वडिलांच्या आज्ञांचे पालन करतो, तेव्हा खरे पाहिले तर आपण देवाच्या आज्ञाचे पालन करत असतो. त्यानेच आम्हांला असे सांगितले आहे की आम्ही आपल्या आई वडिलांच्या आज्ञांचे पालन करावे. आज्ञा पाळताना लेकरांना कोणत्या समस्यांचा सामना करावा लागतो त्याविषयी तुम्ही त्यांच्यासोबत बोला. शेवटी प्रेम आणि आज्ञा पालन हे दोघे एकमेकांशी कसे संबधित आहेत हे त्यांना समजून सांगण्यात सहकार्य करा.

प्रीती

तुम्ही हे ऐकू शकता का?

अब्राहमाची गोष्ट (उत्पत्ती 12:1:5)

खूप खूप वर्षांपुर्वी अब्राहम नावाचा एक मनुष्य होता. जेव्हा तो खूप म्हातारा झाला. तेव्हा त्याला देव म्हणाला, "तुझा देश, तुझे कुटूंब, तुझे नातेवाईक ह्यांना सोड. आणि मी तुला जी भूमीत दाखवेल तेथे जा. मी तुला आर्शीवाद देईल, आणि तुझे वशंजांना मी एक मोठे राष्ट्र देईल तू प्रसिद्ध होशील आणि इतरांसाठी आर्शीवाद ठरशील. पृथ्वीवरील प्रत्येकजण तुझ्यामुळे आर्शीवादित होईल." अब्राहमाने देवाच्या आज्ञाचे पालन केले. आपली पत्नी सारा आणि आपला भाचा लोट आणि आपली सर्व मालमत्ता घेऊन तो निघाला हेरोन नावाच्या शहरातून तो त्याचे घर जे हेरोन शहरात होते तेथून आपल्या नवीन घरासाठी ज्याला देव वचनदत्तक भूमी म्हणत असे तिथे तो प्रवासास निघाला. देवाने अब्राहामाला जे करायला लावले ते सर्व त्याने केले ह्याच्यामागे काय कारण असावे. होय तुम्ही बरोबर बोललात! तो देवावर प्रीती करण्यास आणि त्याच्या आज्ञांचे पालन करण्यास शिकत होता. त्याचे आज्ञापालन म्हणजे त्याच्या जीवनभर चालणाऱ्या धाडसाची सुरुवात होती. आणि हे धाडस म्हणजे आज्ञापालन, प्रीती, विश्वासात वाढण्याचे होते. प्रीती करण्यास आणि त्याच्या आज्ञांचे पालन करण्यास शिकत होता. त्याचे आज्ञापालन म्हणजे त्याच्या जीवनभर चालणाऱ्या धाडसाची सुरुवात होती. आणि हे धाडस म्हणजे आज्ञापालन, प्रीती, विश्वासात वाढण्याचे होते.

तुम्ही हे करू शकता का?

- देव तुम्हांला जे करायला सांगतो ते आज्ञाधारकपणे करून देवाप्रती तुमची प्रीती व तुमचे समर्पण दाखवा.
- आपल्या आई-वडिलांच्या आज्ञांचे पालन करा कारण त्याने देवाचा सन्मान होतो..
- देवावर भरवंसा ठेवा. आणि त्याच्या आज्ञांचे पालन करा. तुम्हांला पूर्णपणे खात्री नसली, तरीही देवावर भरोसा ठेवा. आणि त्याच्या आज्ञांचे पालन करा.

प्रीती

वर्कशीट

❶ प्रीती ह्या पाठातील दिलेली प्रार्थनेची दुसरी ओळ तुम्हांला आठवते का? ती येथे खाली लिहा.

❷ रिकाम्या जागा भरा.

मत्तय 22:37,38 “ तु _____ देव परमेश्वर _____

पूर्ण _____ पूर्ण _____ पूर्ण _____

_____ कर हीच मोठी व _____ _____ आहे

❸ पालन करणे याचा अर्थ काय आहे?

❹ तुमच्या मते आज्ञाधारक बनण्यामध्ये सर्वात अवघड गोष्ट कोणती आहे?

❺ प्रतिक्रियेची वेळ;

रेघारेघांच्या कागदावर तुमच्या चांगल्या हस्ताक्षरात तुम्ही जे वचन पाठ करायचे ते लिहा. आणि त्याला आपल्या आवडीच्या रंगीत कागदावर चिटकवा. हा रंगीत कागद तुम्ही लिहीलेल्या कागदापेक्षा मोठा असावा. हे दोन फोटो फ्रेम सारखे दिसतील. तुम्ही तुमच्या बेडरूमच्या भींतीवर किंवा तुमच्या अभ्यासाच्या टेबलावर ते ठेवा त्याने देवाच्या सर्वात मोठ्या आज्ञांचे तुम्हांला निरंतर आठवण होईल

प्रीती

हे आहे

दररोज दिवसाच्या सुरुवातीला तुम्ही काय केले पाहिजे?

विश्वास ठेवा, आज्ञा पाळा आणि प्रार्थना करा!

देवाचे पवित्रशास्त्र जेव्हा तुम्ही वाचता तेव्हा तुम्ही काय केले पाहिजे?

विश्वास ठेवा, आज्ञा पाळा आणि प्रार्थना करा!

तुम्हांला एखादया चुकीचा मोह होतो, तेव्हा तुम्ही काय केले पाहिजे?

विश्वास ठेवा, आज्ञा पाळा आणि प्रार्थना करा!

जर एखादा तुमचा दिवस खुप-खुप वाईट गेला तर तुम्ही काय करायचे?

विश्वास ठेवा, आज्ञा पाळा आणि प्रार्थना करा!

जर तुम्हांला रात्रीची भीती वाटत असेल तर तुम्ही काय केले पाहिजे?

विश्वास ठेवा, आज्ञा पाळा आणि प्रार्थना करा!

देवाच्या दुष्टिकोणातून देवाला आनंद वाटेल असे तुम्ही काय केले पाहिजे?

विश्वास ठेवा, आज्ञा पाळा आणि प्रार्थना करा!

काळ्या रंगात लिहिलेल्या शब्द शिक्षक वाचतात आणि त्यानतंर मुले निळ्या रंगात दिलेल्या डब्यामध्ये लिहिलेल्या शब्दांमध्ये देतात. त्यानंतर तुम्ही तुमचा गटाला त्यांचे स्वतःचे स्फुर्ती गीत गीते लिहिण्यास उत्तेजन द्या, त्यांनी दिलेली शब्दरचना फळ्यावर लिहून काढा. लेकरे आपली स्वतःहाचे स्फुर्ती गीत गीत गातांत तेव्हा त्यांची ऊर्जा कशी वाहते त्याचाकडे लक्ष द्या.

दया

तुम्ही हे बोलु शकता का?

जशी तू माझ्यावर प्रीती केली तशी इतरांवर प्रीती करण्यास मला सहाय्य कर

योहान 15:12
जशी मी तुम्हांवर प्रीती केली तशी तुम्ही एकमेकांवर प्रीती करावी अशी माझी आज्ञा आहे.

तुम्ही हे शोधू शकता का?

1 करींथकरांस पत्र 13:4-7

1 योहान 4:7-11

1 योहान 3-18

तुम्हांला हे जाणवते का?

कोणावर प्रीती करण्याची आज्ञा आम्हांला करण्यात आली आहे.

आम्ही कशी प्रीती केली पाहिजे.

तुमचा कुटूंबाचे प्रेम तुम्हांला खरोखर कधी जाणवतो.

देव तुमचावर प्रीती करतो हे तुम्हांला कसे जाणवते.

दया

“पॉपकॉर्न प्रार्थना” एकांताचे सत्र

“ती जशी माझ्यावर प्रीती केली तशी इतरांवर प्रीती करण्यासाठी मला मदत कर” ही प्रार्थना करून पुन्हा एकदा मुलांना प्रार्थनाच्या वेळेत चालवा. मुलांकडून ती प्रार्थना पुन्हा-पुन्हा बोलून घ्या. इतरांना देवाची प्रीती कशी दाखवावी याचे मार्ग देवाने सुचवावे अशी एका ओळीची प्रार्थना करण्यास मुलांना उत्तेजन द्या .आता तुम्ही बोलून दाखवा

चला बोलू या!

- देवावर आपल्या पूर्ण हृदयाने, पूर्ण जीवाने, पूर्ण बुध्दिने प्रीती करण्याएवढेच इतरांवर प्रीती करणे ही म्हत्त्वाचे आहे
- इतरांवर प्रीती करणे म्हणजे तुमच्या मित्रावर आणि शत्रूंवर ही प्रीती करणे! अरे बापरे!! हे तर जरा अवघडच काम आहे.
- इतरांवर प्रीती करने म्हणजे येशूने जसे आपल्यावरील त्याचे प्रेम स्वतःचे बलिदान करून प्रकट केले तसे इतरांवर प्रेम करणे म्हणजे दुसऱ्यांना स्वतः पेक्षा महत्त्वाचे स्थान देणे होय.

लेकरांना नातेसंबंधामध्ये कोणत्या तणावाचा सामना करावा लागतो ते आपल्याला सांगतील आणि मुलांना जे आवडत नाही किंवा ज्या लोकांना ती मुले आवडत नाही त्यांच्यावर प्रीती करने किती अवघड आहे ते ही कदाचत लेकरे सांगतील. पहिले करिंथ 13 अध्याय मध्ये प्रीतीचे जे गुणधर्म दिलेले आहेत त्याविषयी चर्चा करा. त्यापैकी कोणते गुणधर्म आत्मसात करणे सोपे आहे आणि कोणते अवघड आहे.

दया

तुम्ही हे ऐकू शकता का?

चांगला शमरोनी लूक 10:25:37

जसा देव आपल्यावर प्रीती करतो, तशी इतरांवर प्रीती करणे याचा अर्थ काय आहे? चला आपण ते पाहूया. आपण ते समजून घेवूया. कोणीतरी येशूला विचारले, "माझा शेजारी कोण आहे!" येशूने ह्या प्रश्नाचे उत्तर एक गोष्ट सांगून दिले. अशा पद्धतीने तो गोष्टी सांगूनच उत्तर देत असे. येशू खुप चांगला कथा सांगणारा होता. तो म्हणाला, "कोणी एक मनुष्य यरुशलेमेहून यरिहो शहरात प्रवेश करत होता. आणि त्याला रस्त्यात काही दुष्ट मनुष्यांनी मारहाण करून त्याच्यावर हल्ला केला त्याच्याजवळचे सर्व पैसे आणि जी काही मालमत्ता होती ती सर्व लुटून घेतली, आणि त्याला रस्त्याच्या बाजूला अर्धमेलेला सोडून ते लोक तेथून पळून गेले. त्यावेळेस तेथून एक याजकही जात होता, त्याने त्या जखमी माणसाला पाहीले आणि आपला रस्ता बदलून तो दुसऱ्या रस्त्याने निघून गेला." आपण जर विचार केला तर हा याजक दयाळू नव्हता असे दिसते, बरोबर की नाही? येशूने गोष्ट पुढे सांगण्यास सुरुवात केली, "एक लेवीही त्या मंदिरात सेवा करणारा होता. तो ही त्या माणसाच्या बाजूने चालत गेला, परंतु त्यानेही त्याला बघून आपली दिशा बदलली." बापरे खरच? तुम्हांला माहीत आहे का यानंतर काय झाले? एक शमरोनी (यहूदी लोक ज्यांना कमी लेखायचे अशा लोकांमधला) जात असता त्याची दृष्टी ह्या जखमी व्यक्तीवर पडली, आणि त्याने काय केले असावे? त्यानी त्या माणसाची काळजी करून देवाची प्रीती त्याला दाखवली, त्याने त्याला स्वच्छ केले आणि त्याच्या जखमांवर पट्टी बांधली. स्वतःच्या गाढवावर त्या माणसाला बसवले आणि त्याला एका उतारशाळेत (आजच्या काळातील हॉटेलमध्ये) नेले, आणि तेथील उतारशाळेच्या व्यवस्थापकास त्या माणसाची काळजी घेण्यास त्याने सुचना दिली. "मी पुन्हा येईपर्यंत तू याची काळजी घे," असे तो त्याला म्हणाला. तसेच शमरोनी त्याला म्हणाला, "तू याच्यावर खर्च करशील यासाठी मी तुला काही चांदीची नाणी देत आहे, आणि याहूनही अधिक खर्च लागल्यास मी ह्या मार्गाने परत येईल तेव्हा मी तुला ते देईल". येशूने ही गोष्ट कशी संपवली? तो म्हणाला, "आता जा आणि तू ही असेच कर.".

तुम्ही हे करू शकता का?

- येशू जसा त्यातून प्रीती करतो तशी तुम्ही करा.
- केवळ आपल्या शब्दाने नव्हे तर आपल्या कृतीने ते प्रगट करा. जेव्हा तुम्ही इतरांची काळजी घेता तेव्हा तुम्ही ते दर्शविता.
- तुम्ही येशूवर आपल्या पूर्ण अंत:करणाने प्रीती करा आणि आत्म्याच्याद्वारे त्याचे प्रेम इतरांपर्यंत पोहोंचावे अशी पवित्र आत्म्याला विनंती करा.

दया

वर्कशीट

1. करुणा ह्या प्रार्थनेची तिसरी ओळ तुम्हांला आठवते का? ती येथे लिहा.

2. रिकाम्या जागा भरा.

   योहान 15:12 जशी मी तुम्हांवर_____ तशी तुम्ही _____ _____करावी अशी

   माझी_____आहे”

3. प्रभू येशूचा वधस्तंभावरील मृत्यु हा त्याच्या तुमच्यावरील परिपूर्ण प्रेमाचे प्रतिक का आहे?

4. तुमच्या ओळखीतील एखाद्या व्यक्तीसाठी तुम्ही त्यांच्यावर पूर्ण प्रेम कसे प्रगट करू शकता याची एक कृती सांगा

5. प्रतीक्रियेची वेळ:

   तुम्ही ज्या व्यक्तीवर प्रेम करू इच्छिता अशा व्यक्तीसाठी एक कार्ड तयार करा कदाचित त्या कार्डवर तुम्ही आजचे पाठांतराचे वचनही लिहू शकता.

दया

हे आहे

देवा माझ्या पूर्ण हृदयाने मी तुझ्यावर प्रीती करतो!

हो मी करतो हो मी करतो!

देवा मी तुझ्यावर माझ्या पूर्ण मनाने प्रीती करतो!

हो मी करतो हो मी करतो!

देवा मी माझ्या पूर्ण बुद्धीने तुझ्यावर प्रीती करतो!

मी करतो मी करतो!

मी माझ्या पूर्ण शक्तीने तुझ्यावर प्रीती करतो.

मी करतो मी करतो!

तुझ्या प्रीतीला मला पाहायचे आहे. आणि अनुभवायचे आहे. अनुभवायचे आहे अनुभवायचे आहे.

अनुभवायचे आहे अनुभवायचे आहे!

शिक्षक पहिल्याने काळ्या रंगातील शब्द वाचतील आणि मुले निळ्या रंगातील शब्द वाचून प्रतिसाद देतील. त्यानतंर तुमच्या वर्गाने एकत्रितपणे असेच एखादे गीत लिहावे म्हणून त्यांना उत्साहित करा आणि त्यांनी दिलेली, लिहिलेली, बोललेली कल्पना तुम्ही फळ्यावर लिहा. त्यांनी जे गीत लिहिले ते गीत मिळून गातांना कशी ऊर्जा निर्माण होते त्याचे निरीक्षण करा

पश्चाताप

तुम्ही हे बोलु शकता का?

माझ्या पापाबद्दल मी दुःखी आहे. मला स्वच्छ धू. माझ्या पापाबद्दल मला वाईट वाटते. मला स्वच्छ धू.

स्तोत्रसहीता 51:2
मला धुऊन माझा दोष पूर्णपणे काढून टाक, माझे पाप दूर करून मला निर्मळ कर.

तुम्ही हे शोधू शकता का?

मत्तय 6:9-15

प्रेषित 3:19

1 योहान 1:9

तुम्हांला हे जाणवते का?

तुम्ही काही तरी चुक केल्यास तुम्हांला कसे वाटते?

तुम्हांला कोणी तरी क्षमा केल्यास कसे वाटते?

दर वेळेस म्हणावे म्हणून तुम्ही दुसऱ्यांदा क्षमा कर असे म्हणत नाही त्याच्या मागे काय कारण असेल?

पश्चाताप



“पॉपकॉर्न प्रार्थना” एकांताचे सत्र

माझ्या पापाबद्दल मला वाईट वाटते. मला स्वच्छ धू. ही प्रार्थना करण्यासाठी मूलांना प्रार्थनेत चालवा. लेकरांनी ही प्रार्थना पुन्हा पुन्हा म्हणावी असे होऊ द्या. देवाने त्यांना क्षमा करावी, आणि त्यानी इतरांना क्षमा करण्यास देवाने त्यांना मदत करावी म्हणून एका ओळीची प्रार्थना करण्यास मुलांना मदत करावी.

चला बोलू या!

- क्षमा करण्याबाबत तुम्हांला समजण्यास सर्वांत कठीण असे काय वाटते?
- ज्या लोकांनी तुम्हांला दुखवले आहे त्यांनां क्षमा करणे इतके अवघड का असते?
- “मी चुकलोय, मला कृपया क्षमा करा”? असे म्हणने कठीण का आहे?”
- देवा समोर मन स्वच्छ होणे, देवा समोर, आई-वडिलांसमोर, बहीन-भावंडासमोर, आणि मित्रांसमोर जेव्हा ते आपल्याला क्षमा करतात त्या नंतर आपल्याला कसे वाटते.

आपल्या सर्वच्या सर्व प्रकारच्या पापांची क्षमा करण्यास देव तयार आहे ह्या विषयी बोला आणि चर्चेला सुरुवात करा. आपल्या समोर उदाहरण आहे, तो आपल्याला क्षमा करतो म्हणून आपणही इतरांना क्षमा करण्यास तयार असले पाहिजे. तुम्ही मिळून प्रभूने शिकवलेली प्रार्थना एकत्र म्हणू शकता. अनेकदा इतरांना क्षमा करण्यास आपल्याला अवघड जाते तशा घटना का घडतात त्याविषयी विचार करा आणि देवाचे सहाय्य मागा.

पश्चात्ताप

तुम्ही हे ऐकू शकता का?

क्षमा न करणाऱ्या सेवकाची गोष्ट (मत्तय 18:21-35)

पेत्राने येशूला विचारले,"जर आम्हाविरुद्ध कोणी पाप केले तर आम्ही त्याला किती वेळेस क्षमा केली पाहिजे, सात वेळेस का?" येशूने उत्तर दिले "सात वेळेसच नव्हे तर साताच्या सत्तर वेळेस" आणि असे म्हणून त्याने गोष्ट सागंण्यास सुरुवात केली. एके दिवशी एका राजाने आपल्या सर्व सेवकांना एकत्र केले, आणि प्रत्येकावर किती कर्ज आहे त्याचा हिशोब घेतला. त्यांच्यापैकी एका सेवकावर राजाच्या पैशांचे खूप जास्त कर्ज होते. आणि तो सेवक आपल्या आयुष्यभरही ह्या कर्जाची फेड करू शकला नसता. मग राजा म्हणाला,"मी तुला व तुझ्या कुटूंबाला गुलाम म्हणून विकेल म्हणजे तुझ्यावर जे माझे कर्ज आहे त्याची त्याद्वारे फेड होईल. राजाचे हे शब्द ऐकताच तो सेवक रडू लागला व गयावया करू लागला. तो सेवक गयावया करत म्हणाला, "नको महाराज कृपया आपण असे करू नका मी तुम्हांला भीक मागतो. कृपया माझ्यावर व माझ्या कुटूंबावर दया करा." राजा दयाळू मनाचा होता, आणि त्याला त्याची दया आली आणि तो त्याला म्हणाला,"चल ठीक आहे मी तुला सोडून देतो - आजपासून तू सर्व कर्जातून मुक्त झाला आहेस." आता अशाप्रकारे हा सेवक कर्जमुक्त झाला. "परंतु ह्याच सेवकाने पुढे काय केले असावे? हाच सेवक बाहेर गेला, आणि त्याच्या सोबतीच्या एका सेवकाला त्याने धरले कारण त्याचावर ह्याचे थोडे फार कर्ज होते. तो त्याला म्हणाला, "जर तू मला माझा पूर्ण पैसा आत्ताच दिला नाही तर मी तुला जेलमध्ये टाकेन." त्या सेवकाने त्याला विनंती केली, "कृपया मला थोडा वेळ दे, माझ्यावर थोडी दया कर, मी तुझाकडे दयेची भीक मागतो" परंतु त्या सेवकाला त्याची दया आली नाही, कारण त्याचे मन कठोर झाले होते, आणि त्याने त्याच्यावर दया दाखवली नाही. त्याने त्याऐवजी त्याला जेलमध्ये टाकले. लवकरच ज्या सेवकाला राजाने कर्ज माफ केले होते त्यानेच पुढे काय केले हे राजाला माहीत पडले. त्याला खुप राग आला आणि तो म्हणाला, "अरे दुष्ट सेवका! तू माझ्याकडे इतकी विनंती केली म्हणून मी तुझे कर्ज माफ केले नाही का? तर तू तुझ्या सेवकाला तसाच कळवळा दाखवायाला हवा होता की नाही?" आणि मग राजाने काय केले हे तुम्हांला माहीत आहे काय? राजाने त्या दुष्ट सेवकाला तुरुंगात टाकले आणि राजाचे त्याच्यावर जितके कर्ज होते ते फेडे पर्यंत त्याने त्याला शिक्षा दिली.

तुम्ही हे करू शकता का?

- आपल्या पापांचा रोज पश्चाताप करून देवाने तुम्हांला शुध्द धुवावे अशी प्रार्थना करा आणि त्याने तुम्हांला बर्फासारखे शुभ्र करावे अशी विनंती करा.
- देव तुमचे सर्व पाप धुऊन टाकतो असा विश्वास ठेवा.
- तुम्ही पाप करू नये म्हणून देवाला मदत मागा. तुम्ही लोकांना क्षमा देणारे आणि दयेने वागवणारे व्हावे, अशी देवाने तुम्हांला मदत करावी ही प्रार्थना करा.
- इतरांना क्षमा करण्यास नेहमी तयार असा आणि त्यांच्याविरुद्ध मनामध्ये अढी बाळगू नका.
- नेहमी दुसऱ्यांना क्षमा करण्यास तयार रहा आणि त्यांच्याविरूद्ध कोणताही राग आपल्या मनात बाळगू नका.

पश्चाताप

वर्कशीट

1. पश्चातापाच्या प्रार्थनेची ही चौथी ओळ तुम्हांला आठवते का कृपया ती खाली लिहा.

2. रिकाम्या जागा भरा.

   स्तोत्रसंहिता 51:2 माला धुवून माझा_____ पूर्णपणे_____ टाक,

   माझे _____ दूर करून मला _____कर

3. आपण दररोज आपल्या पातकांची कबुली देवाला का दिली पाहिजे? देवासमोर आपण आपले पाप दररोज कबुल का केले पाहिजे?

4. इतरांना क्षमा करने इतके महत्त्वपूर्ण का आहे?

5. प्रतिक्रियेचा वेळ

   क्षमेचा साखळ्या- कागदाचे एक समान तुकडे करा. त्या तुकडयांचा एका बाजुला "देव मला क्षमा करतो" असे लिहा तसेच त्याच्या मागच्या बाजूस "मी दुसऱ्यांना क्षमा करतो " असे लिहा. या दोन्ही कागदाच्या फिती एकमेकांमध्ये गुंतवा. तुम्ही आपल्या खोलीमध्ये देव तुम्हांला नेहमी-नेहमी क्षमा करतो याची आठवण म्हणून तुमच्या खोलीत तुम्ही हे टांगू शकता.

पश्चाताप

हे आहे

जेव्हा आपण आज्ञा उल्लंघन करतो तेव्हा आपण काय केले पाहिजे?

पश्चाताप करा, प्रार्थना करा आणि परत फिरा!

आपण एखादा चुकीचा शब्द बोलो तर आपण काय केले पाहिजे?

पश्चाताप करा, प्रार्थना करा आणि परत फिरा!

आपण जर खोटे बोलो तर आपण काय केले पाहिजे?

पश्चाताप करा, प्रार्थना करा आणि परत फिरा!

जर आपण भाडंणाला सुरूवात केली तर आपण काय केले पाहिजे?

पश्चाताप करा, प्रार्थना करा आणि परत फिरा!

आपण दुसऱ्यांना क्षमा करत नाही तेव्हा आपण काय केले पाहिजे?

पश्चाताप करा, प्रार्थना करा आणि परत फिरा!

आपण दुसऱ्यांसंगती दयेने वागत नाही तेव्हा आपण काय केले पाहिजे??

पश्चाताप करा, प्रार्थना करा आणि परत फिरा!

आपण आपल्या मनात येईल तसे चालतो?

पश्चाताप करा, प्रार्थना करा आणि परत फिरा!

शिक्षक पहिल्याने काळ्या रंगातील शब्द वाचतील आणि मुले निळ्या रंगातील शब्द वाचून प्रतिसाद देतील. त्यानतंर तुमच्या वर्गाने एकत्रितपणे असेच एखादे गीत लिहावे म्हणून त्यांना उत्साहित करा आणि त्यांनी दिलेली, लिहिलेली, बोललेली कल्पना तुम्ही फळ्यावर लिहा. त्यांनी जे गीत लिहिले ते गीत मिळून गातांना कशी ऊर्जा निर्माण होते त्याचे निरीक्षण करा

उपासना

तुम्ही हे बोलु शकता का?

मी आपल्या संपूर्ण हृदयाने तुझे स्तुती करीन!

स्तोत्रसंहित 9:1

मी अगदी मनापासून परमेश्वराचे उपकारस्मरण करीन; तुझ्या सर्व अद्भुत कृतीचे वर्णन करीन

तुम्ही हे शोधू शकता का?

स्तोत्रसंहिता 145

मत्तय 21:16-17

1 थेस्सलनीकाकरांस 5:18

प्रगटीकरण 4:11-18

तुम्हांला हे जाणवते का?

स्तुती म्हणजे काय?

आपण देवाची स्तुती कशी करू शकतो?

आपण देवाची स्तुती केव्हा करू शकतो?

उपासना



“पॉपकॉर्न प्रार्थना” एकांताचे सत्र

हे देवा मी आपल्या संपूर्ण हृदयाने तुझी स्तुती करीन! ही प्रार्थना पुन्हा एकदा करून मुलांना प्रार्थनाच्या वेळेत घेऊन चला. मुलाने हे प्रार्थना तुमच्या मागे पुन्हा म्हणावी, देव किती माहान आहे किती अद्भुत आहे तो किती चांगला आहे हे देवाला सांगत त्याची स्तुती आणि उपासना करण्यासाठी एका ओळीची प्रार्थना मुलांनी करावी असे करा, ते देवाला जे काही म्हणू शकतात किंवा म्हणू इच्छिता की देव किती महान आहे हे सांगणारी एखादी गीताची ओळ त्यांनी म्हणावी असे त्यांना करा.

चला बोलू या!

- अनेकदा देवाची स्तुती करणे आपल्याला इतरांपैकी फार सोपे जाते.
- देवाची स्तुती करणे तुम्हांला कधी-कधी सोपे वाटते ते सांगा.
- देवाची स्तुती करणे तुम्हांला कधी अवघड वाटते ते सांगा.
- आपले अंतःकरण आभार पूर्ण असे, हे देवाच्या स्तुती करण्याचाच एक भाग आहे आणि त्यांने देवाला आंनद ही होतो.
- तुम्ही झोपेतून उठतांना त्याची स्तुती करा! तुम्ही जेवण करात तेव्हा त्याची स्तुती करा! तुम्ही जेव्हा शाळेला जाता आणि जेव्हा घरी येता तेव्हा त्याची स्तुती करा तुम्ही झोपायला जाण्या आगोदर देवाची स्तुती करा.
- स्वर्गीय पित्याची स्तुती करण्याची सवय स्वतःला लावण्यामुळे तो नक्कीच आनंदित होईल आणि सोबत तुम्हांला देखील खुप सुखी व आनंदित वाटेल.

उपासना कशी करावी हे लेकरांस ठाऊक आहे! ते येशूवर किती प्रेम करतात हे इतरांना दाखवण्यापासून ते स्वतःला थांबू शकत नाही आणि ते प्रेम तर संसर्गजन्य आहे. त्यांना उपासनेची सगळ्यात उत्तम पद्धत कोणती वाटते ते सांगण्यास उत्तेजित करा. आभारी असणे म्हणजे काय या विषयी नक्कीच बोला. नेहमीच सगळ्याच बाबतीत आभार मानने आवगळ आहे. परंतु स्तुती करण्याची आणि आभारी असण्याची सवय आपल्या स्वतःला लावणे खुप चांगले आहे..

उपासना

तुम्ही हे ऐकू शकता का?

येशूच्या जन्माची गोष्ट. (लुक 1आणि 2)

खुप - खुप वर्षां अगोदर, जवळपास सुमारे दोन हजार वर्षांआधी, मरीया नावाच्या एका तरुणीला गॅब्रीएल नावाचा देवदूताने दर्शन दिले. मरीयेसाठी त्याच्याकडे एक विशिष्ट संदेश होता. "हे मरीये भिऊ नकोस, कारण देवाने तुझ्यावर कृपादृष्टी केली आहे. तू गर्भवती राहशील, आणि एका पुत्राला जन्म देशील, आणि तू त्याचे नाव येशू ठेवशील. तो अतिशय महान होईल, आणि त्याला "परात्पराचा पुत्र" असे म्हणतील."

येशूचा जन्म झाल्यानंतर एक खुप मोठा उत्सव झाला! अचानक स्वर्गातून असंख्य दूत खाली आले. आणि तेही देवाची स्तुती करण्यास सामील झाले. ते म्हणाले; 'स्वर्गात देवाला गौरव! आणि देवाला प्रसन्न करणाऱ्या प्रत्येकावर पृथ्वीत शांती!'" लवकरच नविन जन्मलेला बाळ राजाला, भेटण्यासाठी आणि उपासना करण्यासाठी मेंढपाळ एकत्र आले. ज्या गोष्टी त्यांनी पाहिल्या व ऐकल्या होत्या, त्या विषयी ते देवाचे गौरव करत होते व देवाची स्तुती करत होते. पुर्व दिशेहून काही ज्ञानी लोक बाळ येशूचा शोध करत करत आले. त्यांच्या राजाची उपासना करण्यासाठी त्यांना मार्ग दिसावा म्हणून रात्रीच्या वेळी आकाशामधून एका तेजस्वी सुंदर ताऱ्याने त्यांचे मार्गदर्शन केले. मरीया, योसेफ, ते मेंढपाळ आणि त्या ज्ञानी लोकांनी बाळ येशूचा सन्मान केला व त्याची उपासना केली तसेच आपणही त्याचा सन्मान करून त्याची उपासना केली पाहिजे. आणि एके दिवशी जेव्हा आपण स्वर्गात त्याच्या सिहांसनाभोवती असू तेव्हा आपण युगानुयुग अनंतकाळ त्याचा सन्मान आणि त्याची उपासना करत राहू

तुम्ही हे करू शकता का?

- दररोज देवाची स्तुती करणे.
- सर्व परिस्थितीत देवाची स्तुती करणे. येथे तुम्हांला निवड करावी लागणार आहे.
- देवा प्रती आपले अंतःकरण धन्यवादाने भरलेले असावे, आणि देवाने आपल्या अवती भोवती ज्यांना ठेवले त्याविषयी ही आपण देवाचे आभार मानावे; तुमचे कुटूंब, तुमचे मित्र आणि तुमचे शिक्षक,
- स्तुती करण्याची सवय स्वतःला लावून घ्या

उपासना

वर्कशीट

1. प्रार्थनेची पाचवी ओळ तुम्हांला आठवते का? उपासना ती येथे खाली लिहा

2. रिकाम्या जागा भरा

   स्तोत्रसहिंता 9:1 “मी अगदी_____ _____करीन; तुझ्या सर्व _____

   वर्णन_____”

3. प्रभू येशूची आम्ही कोणकोणत्या प्रकारे उपासना करू शकतो, ते तुम्ही येथे लिहू शकणार का?

4. उपासना करण्याची तुमची सर्वात आवडती पद्धत कोणती

5. प्रतिक्रियाचा वेळ

   “माराका” नावाचे एक वाद्य बनवणे फार सोपे आणि मजेशीर आहे. पाण्याची रिकामी बॉटल त्यात तांदुळ किंवा काही थोडे धान्य भरा. त्या बॉटलवर स्टिकर्स चिंटकवून किंवा स्केचपेननी चित्र काढा.आणि आता ती बॉटल वाजवत तुम्ही येशूसाठी गीत गाऊ शकता आणि नाचूही शकता.

उपासना

हे आहे

येशू आमच्या सर्व स्तुतीच्या योग्य आहे!

आमेन आमेन

आम्ही त्याची स्तुती संपूर्ण दिवस केली पाहिजे!

आमेन आमेन

त्याचे लेकरे गीत गातात त्यामुळे त्याला अत्याआनंद होतो!

आमेन आमेन

म्हणून आपण एकत्र येऊन त्याच्या स्तुतीचे गीत गाऊया!

आमेन आमेन!

येशू आम्हांला आमच्या पापांपासून तारावयास आला!

आमेन आमेन!

आपण नेहमी त्याला ख्रिस्त आमचा राजा म्हणतो!

आमेन आमेन!

शिक्षक पहिल्याने काळ्या रंगातील शब्द वाचतील आणि मुले निळ्या रंगातील शब्द वाचून प्रतिसाद देतील. त्यानतंर तुमच्या वर्गामध्ये तुम्ही सुद्धा एकत्रितपणे असेच एखादे गीत लिहावे, म्हणून त्यांना उत्साहित करा आणि त्यांनी दिलेली, लिहिलेली, बोललेली कल्पना तुम्ही फळ्यावर लिहा. त्यांनी जे गीत लिहिले ते गीत मिळून गातांना कशी ऊर्जा निर्माण होते त्याचे निरीक्षण करा

समर्पण

तुम्ही हे बोलु शकता का?

येशू मला तुझे अनुसरण, माझा स्वामी म्हणून करायचे आहे. तुला जसे हवे तसे तू मला बदल.

योहान 13:13

तुम्ही मला "गुरू" व प्रभू असे संबोधिता आणि ते ठीक बोलतात; कारण मी तसाच आहे.

तुम्ही हे शोधू शकता का?

मत्तय 4:18-22

मत्तय 16:24

गलती 2:20

तुम्हांला हे जाणवते का?

येशूच्या मागे चालणे याचा अर्थ काय?

देव मला कसे बदलत आहे?

सध्या तुम्ही कोणाच्या किंवा कशाच्या मागे चालण्यास समर्पित आहात?

समर्पण

“पॉपकॉर्न प्रार्थना”
एकांताचे सत्र

येशू मी तुला माझा स्वामी म्हणून अनुसरावे अशी माझी इच्छा आहे. तुला हवे तसे मला तू बदल.” हे वाक्य म्हणून मुलांनसोबत परत एकदा प्रार्थना म्हणा त्यांना ही प्रार्थना तुमच्या मागे म्हणण्यास सांगा. प्रभू येशू हा त्यांचा प्रभू आहे आणि मुलांना त्याचे अनुसरण करायचे आहे. ही इच्छा व्यक्त करणाऱ्या एका ओळीची प्रार्थना करण्यास त्यांना उत्साहित करा.

चला बोलू या!

- एखाद्या व्यक्तिप्रति किंवा एखाद्या विशिष्ट कारणासाठी निष्ठावान राहण्याचे अभिवचन म्हणजेच समर्पण होय.
- समर्पणामध्ये वेळ पैसा आणि कठिण परिश्रम हे तिन्ही अंतर्भूत होत असतात. एखाद्या खेळासाठी संघात ते आहेत तर त्यांना- आपली स्वतःची फी भरायची, प्रॅक्टीससाठी स्वतः जायचे आणि जेव्हा टुर्नामेंट असता तेव्हा खेळामध्ये खेळायचा अश प्रकारचे समर्पण करावे लागते.
- तुमच्या जीवनात प्रभू म्हणून तुम्ही येशूचे अनुसरण करण्यासाठी समर्पित असावे अशी त्याची इच्छा आहे.
- “जसा तुला हवा तसा माझ्यात बदल कर” हे म्हणणे म्हणजेच तुम्ही येशू ख्रिस्ताला तुमचे जीवन पूर्णपणे समर्पित करून तो म्हणेल तसे जीवन जगण्यास तयार आहात हे दर्शविणे हे होय.
- समर्पण टिकवून ठेवणे सोपे नव्हे.

तुम्ही समर्पणाविषयी बोलत असतांना मुले कोणकोणत्या समर्पणात सध्या सहभागी आहेत ते त्यांना सांगायला संधी द्या (सांघिक खेळ, वाद्य शिकण्यास, इत्यादी) आणि हे समर्पण पूर्ण करण्यासाठी कोणत्या गोष्टी सोप्या व अवघड आहेत हे पण त्यांना सांगू द्या. प्रभू येशूचा समर्पित शिष्य बनने म्हणजे याचा अर्थ काय होतो या विषयी तुम्ही त्यांच्याशी बोला. कोणकोणत्या बाबतीत ते वेगळे आहेत? कोणकोणत्या बाबतीत त्या दोन्ही गोष्टी समान आहेत? प्रामाणिकपणे आणि मोकळेपणाणे त्यांना आपले मत मांडण्यास उत्तेजित करा.

समर्पण

तुम्ही हे ऐकू शकता का?

पेत्र परिपूर्ण नव्हता (लुक 22:54-62)

पेत्र परिपूर्ण नव्हता (लुक 22:54-62) पेत्र एकदा येशूला म्हणाला, "तुला, इतर सर्वांनी जरी नाकारले तरीही मी तुला कधीच नाकारणार नाही!" वधस्तंभ देण्यापुर्वी मुख्य याजकाच्या घराच्या अंगणामध्ये पहाटेच कोंबडा आरवण्यापुर्वीच पेत्र त्याला तीनदा नाकारणार होता, हे येशूला ठाऊक होते आणि ते येशूने पेत्राला सांगितले. येशूने म्हटल्याप्रमाणेच घडले. त्या घरात काम करणारी एक दासी मुलगी पेत्राला पाहून त्याला म्हणाली, "तू येशू सोबत होतास." "नाही, हे खरे नाही - तू कशाविषयी बोलत आहेस हे मला कळत नाही!" पेत्राने तिला उत्तर दिले. थोड्या वेळाने तेथे उपस्थित एका दुसऱ्या दासीने तेथील लोकांना सांगितले, "नक्कीच हा व्यक्ति येशू संगती होता", आणि पुन्हा पेत्राने तेथे ही नाकार दिला. आणि थोडा वेळ गेला. पेत्र खरोखर घाबरलेला होता आणि तो फार उदासही होता. त्याची इच्छा होती की लोकांनी त्याला ओळखू नये, परंतु पुन्हा परत त्याला कोणीतरी ओळखलेच, "आम्हांला हे ठाऊक आहे की तू ही त्यांच्यापैकीच कोणीतरी आहेस. गलिलातील लोकांसारखीच तुझी ही बोलण्याची शैली आहे." पेत्र श्राप देऊ लागला आणि शपत घेऊ लागला आणि तो म्हणाला, "मी ह्या माणसाला ओळखतच नाही!" परंतु येशूने जसे सांगितले अगदी तसेच घडले, "कुकडकु!" ओहो! अरे बापरे! अचानक येशूचे शब्द पेत्राला आठवले, आणि तो रडत धावत तेथून सुटला, काय घडणार ते येशूने अगोदरच त्याला सांगितले, अगदी तसेच घडले आणि त्याबद्दल त्याला फार दुःख वाटले. परंतु तुम्हांला माहीत आहे का? येशूने पेत्राविषयीची आशा सोडली नाही. येशू ख्रिस्त मेलेल्यातून पुन्हा जिवंत झाल्यानतंर पेत्र येशूच्या शिष्यांबरोबर तिबेरियस नावाच्या सरोवराच्या किनाऱ्यावर न्याहारी करत होता. येशूने पेत्राला तीन वेळेस विचारले, "पेत्रा तू माझ्यावर प्रीती करतो काय?" प्रत्येक वेळेस पेत्राने उत्तर दिले, "होय! प्रभू तुला ठाऊक आहे की मी तुझ्यावर प्रीती करतो." आणि प्रत्येक वेळेस येशूने त्याला उत्तर दिले, "माझ्या मेंढरांना चारा." येशूची इच्छा होती की पेत्राने त्याचे शिष्य बनावे, आणि शिष्य देखील बनवावे. जरी पेत्र परिपूर्ण नव्हता, पेत्र येशूला आपला प्रभू म्हणून त्याच्या मागे चालण्यास खरोखर इच्छुक आहे हे येशूला ठाऊक होते. त्यानतंर पुन्हा पेत्राने कधीही येशूचा नाकार केला नाही.

तुम्ही हे करू शकता का?

- येशू हा तुमच्या जीवनाचा प्रभू आहे व तुम्ही तसेच अनुसरण व समर्पण करण्याचा निश्चय करा.
- तुमचे विचार, तुमची कृती आणि तुमच्या इच्छांचा पूर्ण ताबा प्रभू येशूच्या हातात देवून समर्पण करा..
- या जगातील इतर कशाही पेक्षा सगळ्यात महत्त्वाचा येशू आहे. हे तुम्ही त्यांना सांगा आणि तुम्ही त्याच्या मागे चालु इच्छिता त्याच्या आज्ञाचे पालन करू इच्छिता आणि अधिक-अधिक त्याच्यासारखे बनू इच्छिता हे त्याला सांगा.

समर्पण

वर्कशीट

1. प्रार्थनेतील सहावी ओळ **समर्पण** तुम्हांला आठवते का? ती येथे खाली लिहा.

2. रिकाम्या जागा भरा.

   योहान 13:13 “तुम्ही मला_____व_____ असे _____आणि ते _____

   कारण _____तसा_____.”

3. येशूच्या मागे चालणे हे समर्पण का आहे?

4. तुम्ही कोणकोणत्या गोष्टींसाठी (खेळ, आवड, क्लासेस इ.) समर्पित आहात?

5. प्रतिक्रियेची वेळ

   आपले डोळे बंद करा, आणि येशूला मागा, “जर मी तुझ्या तळमळीने भरलेला असा समर्पित अनुयायी असतो, तर ते चित्र कसे असते?” तुम्ही आता काय केले असते? येशू तुम्हांला काय दाखवतो त्याचे एक चित्र काढा आणि ते तुमच्या वर्गाला आणि तुमच्या आई वडिलांना सांगा.

समर्पण

हे आहे

तुम्ही तुमच्या आईला दिवस भराच्या कामात मदत करता

खुप छान खुप छान!

तुम्ही एखादा खेळ खेळण्यासाठी सुरुवात करता परंतु तेथे जाऊन विसरतात

फार वाईट, फार वाईट

तुम्ही तुमच्या मित्राला वर्गामध्ये मदत करता

खुप छान खुप छान!

तुम्ही तुमच्या पियानो शिकण्याचा क्लास बुडवता

फार वाईट, फार वाईट

तुम्ही जे काही अभिवचन दिली आहेत ते पूर्ण करता

खुप छान खुप छान!

म्हणून आपले समर्पण पूर्ण करा आणि प्रार्थना करणे विसरू नका!

शिक्षक पहिल्याने काळ्या रंगातील शब्द वाचतील आणि मुले निळ्या रंगातील शब्द वाचून प्रतिसाद देतील. त्यानतंर तुमच्या वर्गामध्ये तुम्ही सुद्धा एकत्रितपणे असेच एखादे गीत लिहावे म्हणून त्यांना उत्साहित करा आणि त्यांनी दिलेली, लिहिलेली, बोललेली कल्पना तुम्ही फळ्यावर लिहा. त्यांनी जे गीत लिहिले ते गीत मिळून गातांना कशी ऊर्जा निर्माण होते त्याचे निरीक्षण करा

अवलंबून राहणे

तुम्ही हे बोलु शकता का?

मला तुझ्या पवित्र आत्म्याने भर

इफिस 5:18 चा दुसरा भाग
पवित्र आत्म्याने भरलेला भाग

तुम्ही हे शोधू शकता का?

प्रेषित 2:1-17

रोम 1:17

रोम 8:26-27

रोम 15:13

गलती 5:22-26

तुम्हांला हे जाणवते का?

पवित्र आत्म्याने भरलेले असणे म्हणजे काय?

देवावर अवलंबुन राहणे म्हणजे काय?

पवित्र आत्म्याची फळे कोणती आहेत?

आपण पवित्र आत्म्याने कसे भरेल जाऊ शकतो?

अवलंबून राहणे



“पॉपकॉर्न प्रार्थना” एकांताचे सत्र

“मला पवित्र आत्म्याने भर” ही प्रार्थना करून मुलांना प्रार्थनेच्या वेळेत चालवा. मुलांना ही प्रार्थना तुमच्या मागे बोलु द्या. देवाने त्यांना पवित्र आत्म्याने भरावे आणि पवित्र आत्मा ज्यातून वाहू शकतो असे वाहक बनवावे ही एका ओळीची प्रार्थना करण्यासाठी त्यांना उत्तेजन द्या .

चला बोलू या!

- पवित्र आत्म्याने भरले जाणे ही संकल्पणा समजण्यास सोपी नाही.
- देवाने तुम्हांला त्याच्या गौरवसाठी उपयोगात आणायचे असेल तर तुम्ही त्याच्या पवित्र आत्म्या वर अवलंबुन राहणे गरजेचे आहे.
- प्रभू येशूसारखे अधिका - अधिक बनण्यासाठी त्याच्या आत्म्यावर अवलंबुन राहणे अवश्यक आहे.
- तुम्ही येशूसारखे बनल्यावर आणि त्याच्या आत्म्याने भरल्यानंतर तुम्ही पवित्र आत्म्याची फळे देऊ शकता.

प्रीती आनंद व शांती आणि धिर हा पवित्र आत्मा तुम्हामध्ये राहतांना निर्माण व्हावे ही फळे प्रत्येक दिवशी जीवन जगत असता आपण आपल्या एखाद्या मित्रावर किंवा एखाद्या सांत्वन कर्त्यावर मार्गदर्शनासाठी अवलंबुन राहतो, या विषयावर चर्चा करा आणि संभाषण चालवा. हा अवलंबुन राहण्याचा संबंध तुम्हांला कसा वाटतो? पवित्र आत्म्याच्या वेगवेगळ्या फळांवर चर्चा करा त्यामध्ये कोणत्या फळाप्रमाणे जगण्यास जास्त कठीण जाऊ शकते या विषयी मुलांनी सांगावे असे करा.

अवलंबून राहणे

तुम्ही हे ऐकू शकता का?

सांत्वन करणारा (योहान्न 14:15-31)

क्षणभर विचार करा, आपले डोळे बंद करा, आणि तुम्ही ज्याच्यावर खरोखर प्रीती करता, अशा एका मित्रा विषयी कल्पना करा. तुम्हांला त्याचा चेहरा दिसतो का? आता तो व्यक्ती तुम्हांला काहीतरी म्हणत आहे अशी कल्पना करा, "मी उद्या, खूप दूरच्या ठिकाणी जात आहे, तेथे तुला येता येणार नाही. परंतु तू काळजी करू नकोस, मी येथे तुझ्यासाठी माझा आत्मा सोडून जाणार आहे ज्याच्या सोबत तू खेळू शकशील व बोलू ही शकशील." तर देवा ऐवजी दूसऱ्या कोणालाही हे घडवण्याचे समर्थ्य नाही, परंतु येशू वधस्तंभावर मरण्याअगोदर नेमके हेच घडले, आणि तो स्वर्गात पित्याच्या उजव्या हातास बसण्यासाठी जिवंत झाला. त्याने आपल्याला एकटे सोडले नाही, येशूने योहान 16-17 मध्ये असे म्हटले,"मी पित्याकडे मागेल आणि तो तुम्हांस दुसऱ्याला मदतीसाठी पाठवून देईल, जो तुम्हांसोबत निरंतर राहिल, तोच सत्याचा आत्मा होय." प्रेरितकार्य पूर्ण करण्यास मदत करण्यासाठी येशूने त्याचा आत्मा पाठवला. आणि त्या नंतर थोड्याच दिवसात एका विशिष्ट दिवशी ज्याला पेन्टेकॉस्ट म्हणतात, जेव्हा सर्व एका खोलीत बसले होते. एक जोराचे वादळ सुटले आणि प्रत्येकजण पवित्र आत्म्याने भरला गेला. त्याचा आत्मा त्यांच्या सोबत नेहमी करता, त्यांचे सांत्वनकर्ता, आणि मदतीस मित्र म्हणून राहणार होता.

तुम्ही हे करू शकता का?

- देवाच्या आत्म्यावर अवलंबुन राहणे शिका. जेणेकरून तो तुम्हांला मार्गदर्शन, सांत्वन आणि शिक्षण देऊ शकेल
- तुमच्या स्वर्गीय पित्याने दररोज पवित्र आत्म्याने भरावे अशी प्रार्थना करा.
- पवित्र आत्म्याची फळ तुम्हामधून दिसून यावे जी पुढे तुमची साक्ष इतरांसाठी आर्शीवाद आणि उत्तेजन बनेल.

अवलंबून राहणे

वर्कशीट

1. आता थोडे अवघड होत आहे. बरोबर ना! प्रार्थनेची सातवी ओळ तुम्हांला आठवते का? अवलंबून राहणे कृपया ते खाली येथे लिहा

2. रिकाम्या जागा भरा

   इफिस 5:18 भाग दोन "_____मस्त होऊ नका, पण_____ _____"

3. पवित्र आत्म्याच्या फळांचे नाव येथे खाली लिहा:

   _____ _____ _____

   _____ _____ _____

   _____ _____ _____

4. यापैकी तुमच्यासाठी कोणत्या फळाचा स्वभाव व्यक्त करणे सर्वात जास्त अवघड किंवा आव्हांनात्मक? त्यासाठी प्रार्थना केल्यास तुम्हांला कशी मदत होऊ शकते?

5. प्रतिक्रियेची वेळ

   एका कागदावर एक वाटी काढा. कार्डबोर्ड पेपर घेऊन वेगवेगळ्या रंगाची वेगवेगळी फळे कापा; संत्र, सफरचंद, केळी, आणि अंगुर तुम्ही निवडा आणि तुम्हांला कोणती फळे काढायची आहे, आता ही फळे त्या कागदावरील वाटीवर चीटकवा आणि सुस्वच्छ अक्षरात गलती 5:22 आणि 23 त्या कागदा खाली लिहा. तुम्ही याला पवित्र आत्म्याने भरण्याची आठवण म्हणून भिंतीवर टांगू शकता.

अवलंबून राहणे

हे आहे

कॅटीने तिच्या मैत्रीणीला चर्चमध्ये आमंत्रित करण्याचे ठरवले.

आत्म्यात? हो हो हो!

ज्याने अभ्यास केला नाही त्याने परिक्षेत कॉपी केली.

आत्म्यात? नाही नाही नाही!

सूजीने आपल्या पूर्ण वर्गाला तिची साक्ष सांगितली

आत्म्यात? होय, होय, होय!!

ब्रायनने त्याच्या आईसाठी प्रार्थना केली कारण ती खूप आजारी होती..

आत्म्यात? होय, होय, होय!

त्याची नव्हती ती वस्तू पेत्राने घेतली

आत्म्यात? नाही, नाही, नाही!

जेसीने एका मिशनऱ्याच्या मुलाला उत्तेजन वर पत्र लिहले.

आत्म्यात? होय हे एक स्फुर्ती गीत गीत आहे!

शिक्षक पहिल्याने काळ्या रंगातील शब्द वाचतील आणि मुले निळ्या रंगातील शब्द वाचून प्रतिसाद देतील. त्यानतंर तुमच्या वर्गामध्ये तुम्ही सुद्धा एकत्रितपणे असेच एखादे गीत लिहावे म्हणून त्यांना उत्साहित करा आणि त्यांनी दिलेली, लिहिलेली, बोललेली कल्पना तुम्ही फळ्यावर लिहा. त्यांनी जे गीत लिहिले ते गीत मिळून गातांना कशी ऊर्जा निर्माण होते त्याचे निरीक्षण करा!

प्रभाव

तुम्ही हे बोलु शकता का?

मला तुझी कृपा, सत्य व न्यायाचे साधन बनव.

योहान 1:14

आम्ही त्याचे गौरव पाहिले ते पित्यापासून आलेल्या एकुलत्या एकाचे गौरव असावे असे अनुग्रह व सत्य ह्याने परिपूर्ण होते.

तुम्ही हे शोधू शकता का?

मत्तय 19:13-15

प्रेषित 2:16-17

लुक 18:15-17

तुम्हांला हे जाणवते का?

देवाने मला दिलेल्या कृपादानांपैकी मला देवाने कोणते कृपादान दिले आहे?

मी इतरांना देवाची कृपा कशी दाखवू शकतो?

सत्य आणि असत्य यामध्ये काय फरक आहे?

खोटे बोलणे चुकीचे का आहे?

प्रभाव



“पॉपकॉर्न प्रार्थना” एकांताचे सत्र

मुलांना प्रार्थनेच्या वेळेत न्या, आणि त्यांनी अशी प्रार्थना करण्यास प्रोत्साहन द्या, “तुझ्या दयेचे, सत्याचे आणि तुझ्या न्यायीपणाचे साधन मला बनव.” देवाची दया इतरांनी दाखविण्यासाठी आणि त्याचे सत्य इतरांना सांगण्यासाठी देवाने त्यांचा उपयोग करावा अशी एका ओळीची प्रार्थना करण्यास मुलांना उत्तेजन द्या.

चला बोलू या!

- येशू आजाऱ्यांना बरे करत असता, आणि गरीबांना मदत करत असता, दररोज देवाचा न्याय इतरांना दाखवात असे. .
- ते लोक म्हातारे, तरुण, श्रीमंत किंवा गरीब आहेत ह्याचा तो विचार करत नव्हता..
- तो सर्वांना सारखीच व चांगली वागणूक देत असे..
- तो प्रत्येकाशी दयाळू पणे आणि प्रीतीने वागत असे.
- तो नेहमी सत्य बोलत असे. आणि तो कधीही खोटे बोलत नाही
- तुमचे मित्र, तुमचे कुटूंब, तुमच्या समाजाशी न्याय कसा दाखवू शकता. मुले अशा प्रकारे न्यायीपणाने वागण्याचे साधन कसे बनू शकतात यावर त्याचा विचार

देवाच्या न्यायीपणाचे वाहक बनण्यासाठी कोणते मार्ग अवलंबुन येते हे मुलांना सांगु द्या. खरे बोलणे कोणकोणत्या वेळस अवघड वाटू शकते त्यावर चर्चा करा. देवाचे वचन आमच्या अंतःकरणात लपवून ठेवल्याने खर बोलण्यास कशी मदत होऊ शकेल?

प्रभाव

तुम्ही हे ऐकू शकता का?

येशू आणि मुले (मत्तय 18:1-6)

एका सुंदर दिवशी दुपारच्या वेळेस येशूच्याभोवती शिष्य बसून होते, आणि ते त्याच्याशी बोलत होते. आणि शाळेमध्ये किंवा घरी किंवा मैदानावर कोणाला सगळ्यात चांगली वागणुक दिली जाते. असा आपण नेहमीच विचार करत असतो, अगदी तसेच हे शिष्य ही विचार करत होते. तर, येशूने त्यांना विचारले, "ते आपले डोके खाजवत होते, "स्वर्गाच्या राज्यात सगळ्यात महत्त्वाचा कोण आहे?" माझ्या मनात सहज विचार येतो की, त्यांच्यापैकी कोणा एकाचे नाव येशूने घ्यावे अशी त्यांची इच्छा होती. ठीक आहे, ते काय विचार करत होते, हे पूर्ण येशूला माहीत होते म्हणून त्याने एका लहान मुलाला तेथे बोलावले, "माझ्या बाजूला उभा रहा," तो म्हणाला, आणि मग त्याने त्यांच्या शिष्यांच्या डोळ्यात निरखून पाहिले त्यांना सगळ्यात अद्भुत गोष्ट सांगितली,"जो कोणी स्वतःला या मुलाप्रमाणे नम्र करतो, तो स्वर्गाच्या राज्यात सर्वात महान आहे," त्यांना त्यांच्यापैकी अद्भुत असे म्हटले, "जो कोणी माझ्या नावात या लहान मुलांचे स्वागत करेल, तो माझे स्वागत करेल." आणि तुम्हांला ठाऊक आहे का जर येशू हे बोलला आहे, तर तो खरोखर जे म्हणत होता, ते सत्य होते. कारण येशू नेहमी सत्य बोलत असे.

येशू ख्रिस्ताला न्यायीपण आवडत असे. तो आपला वेळ बहुतेक वेळेस जे लोक प्रसिद्ध किंवा महान किंवा महत्त्वाचे नव्हते अशा लोकांसोबत घालवत असे, तो गरीबांची मदत करत असे. आजाऱ्यांवर तो दया दाखवत असे. जे अंतःकरणातून दुःखावले असेल त्यांना तो शांती देत असे. आणि मुलांसंगती वेळ घालवणे हे त्याला नेहमीच आवडत असे, कारण त्याच्याकडे बहुतेक वेळेस दुर्लक्ष केल्या जात असे. येशू म्हणाला,"जर कोणी या लहान मुलांना दुःखावेल तर त्या व्यक्तीसाठी ते फार भयंकर होईल." देव तुमच्यावर किती प्रेम करतो आणि तुमची किती काळजी घेतो हे. तुम्हांला जाणवत आहे का? हे लक्षात ठेवा की तुम्ही किती ही वयाचे असले तरी देव तुम्हांला त्याची दया त्याचे सत्य व त्याचे न्यायीपण याचा वाहक म्हणून उपयोगात आणू शकतो.

तुम्ही हे करू शकता का?

- देवाने त्याच्या दयेचा व त्याच्या सत्याचा व त्याच्या न्यायीपणाचा संदेश तुमच्या द्वारे
- इतरांपर्यंत पोहोंचवावा म्हणून त्याला तुमचा उपयोग करू द्या.
- आपल्या अंतःकरणात नेहमी सत्य बोलण्याचा निश्चय करा.
- देवाचे वचन पाठ करा.

प्रभाव

वर्कशीट

1. तुमच्या प्रार्थनेमधील आठवी ओळ तुम्हांला आठवते का? ते येथे खाली लिहा.

2. रिकाम्या जागा भरा

   योहान 1:14 “आणि आम्ही त्याचे_____तो_____आलेल्या एकुलत्या एकाचे_____असावे असे_____व_____ह्यांनी _____ होता.”

3. तुमच्या शाळेत, चर्चमध्ये किंवा तुमच्या शेजाऱ्यापाजाऱ्यांमध्ये कोणी नवीन आला असता, तुम्ही त्याचे स्वागत केले आहे का? जर तुम्ही असे केले असेल तर, तुम्ही त्या व्यक्तीचे स्वागत केले, तो अनुभव आम्हांला सांगा. जर तुम्ही ते केले नसेल तर करून पाहायला काय हरकत आहे? जेवढे जास्त तुम्ही कराल, तेवढे जास्त तुम्हांला सोपे जाईल!

4. एखाद्या अवघड परिस्थितीमध्ये एखाद्या व्यक्तीने योग्य ते करण्यासाठी तुम्ही त्याचे मन वळवले किंवा त्याला मदत केली असेल तर ते सांगा? तुम्ही त्या व्यक्तीला मदत केल्यानंतर त्या व्यक्तीनी कशी प्रतिक्रिया केली असेल ते सांगा

5. प्रतीक्रियेची वेळ;

   तुमच्या अवतीभवती असलेल्या लोकांपर्यंत तुम्ही पोहोंचावे यासाठी देव तुमचा काही प्रकारे उपयोग करू शकतो. असे तुम्हांला वाटते काय? कादाचित तुमच्या मंडळीमध्ये तुम्ही एक प्रार्थना क्लब सुरू करू शकता? जे लोक सहसा प्रार्थनेला जात नाही, चर्चला जात नाही. अशा काही मित्रांना तुम्ही तुमच्या सोबत चर्चला जाण्यासाठी आमंत्रण देऊ शकता? तुमच्या क्लासमध्ये तुमच्या नवीन शेजाऱ्याला किंवा एखाद्या मुलाला

प्रभाव

हे आहे

मला तुझ्या सत्याचे वाहक बनायचे आहे!

बनावयाचे आहे, बनावयाचे आहे!

मला तुझ्या कृपेचे शब्द बोलायचे आहे!

बोलायचे आहे, बोलायचे आहे!

माझ्या जीवनात दररोज मला तुझे न्यायीपण दाखवण्याची इच्छा आहे

दाखवायचे आहे, दाखवायचे आहे!

जे भटकले आहेत आणि हरवले आहेत त्यांची मला मदत करायची आहे

होय मदत करायची आहे, मदत करायची आहे!

ज्यांच्याकडे फार थोडे आहेत त्यांना ही मला मदत करायची आहे

मदत करायची आहे, मदत करायची आहे!

ज्यांच्याकडे दुसरे लोक दूर्लक्ष करता त्यांच्याकडे मला लक्ष द्याचे आहे

लक्ष द्याचे आहेत, लक्ष द्याचे आहेत!

मला तुझ्या प्रेमाचे वाहक बनव!

शिक्षक पहिल्याने काळ्या रंगातील शब्द वाचतील आणि मुले निळ्या रंगातील शब्द वाचून प्रतिसाद देतील. त्यानतंर तुमच्या वर्गामध्ये तुम्ही सुद्धा एकत्रितपणे असेच एखादे गीत लिहावे म्हणून त्यांना उत्साहित करा आणि त्यांनी दिलेली, लिहिलेली, बोललेली कल्पना तुम्ही फळ्यावर लिहा. त्यांनी जे गीत लिहिले ते गीत मिळून गातांना कशी ऊर्जा निर्माण होते त्याचे निरीक्षण करा!

शिष्यत्व

तुम्ही हे बोलु शकता का?

इतरांना तुझे अनुयायी बनण्यास व आमत्रंण देण्यास तुझ्या गौरवासाठी माझा उपयोग कर

मत्तय 28:19
तेव्हा तुम्ही जाऊन सर्व राष्ट्रांतील लोकांस शिष्य करा; त्यांना पित्याच्या, पुत्राच्या व पवित्र आत्म्याच्या नावाने बाप्तिस्मा द्या. .

तुम्ही हे शोधू शकता का?

मार्क 16:15
योहान 17:5
रोम 10:13-17
कैल्लसे 3:17

तुम्हांला हे जाणवते का?

- मिशनरी म्हणजे काय?
- शिष्य म्हणजे काय?
- येशू विषयी इतरांना आपण कोणकोणत्या प्रकारे सांगू शकतो?
- देवाच्या गौरवासाठी काही तरी करने म्हणजे काय?

शिष्यत्व

“पॉपकॉर्न प्रार्थना”
एकांताचे सत्र

इतरांनी तुझे अनुयायी बनण्यास आमंत्रण देण्यास व तुझ्या गौरवासाठी माझा उपयोग करून घे. ही प्रार्थना मुलांकडून पुन्हा पुन्हा म्हणून घ्या त्यांनी तुमच्या मागे ती बोलावी असे करा. देवाच्या गौरवासाठी त्याचा उपयोग होणे आणि येशूचे अनुयायी बनण्यासाठी इतरांना आमंत्रण देण्यासाठी मुलांनी प्रार्थना करावी असे त्यांना उत्तेजन द्या.

चला बोलू या!

- येशू ख्रिस्ताचा शुभवर्तमानाचा प्रचार करण्यासाठी देवाद्वारे बोलावल्या गेलेल्या लोकांना मिशनरी असे म्हणतात.
- अनेकदा याचा अर्थ असा होतो की दूर देशात प्रवास करने आणि एखादी नवी भाषा आणि नवी संस्कृत शिकणे हे ही त्यामध्ये असेल.
- जीवन म्हणजे देवा प्रती समर्पण व त्यागाचे होय.

येशूची इच्छा आहे की आपण जेथे राहतो, आणि जेथे कुठे आपण जातो, मग ते शाळा असो अथवा घर, आपण त्याचे मिशनरी व्हावे. मुलांना जे मिशनरी माहीत आहेत त्यांच्या विषयी सांगून तुम्ही या सत्राची सुरूवात करावी, कदाचित त्यांच्या चर्चमध्ये किंवा जगात इतर ठिकाणी गेलेले काही मिशनरी त्यांच्या ओळखीचे असतील, मुले आपल्या कुटूंबासोबत किंवा आपल्या मित्रांसोबत कोणकोणत्या वेगवेगळ्या स्वरूपात आणि कृती द्वारे किंवा पद्धतीने येशू विषयी सांगू शकतील हे बोलण्यास त्यांना उत्तेजन द्या

शिष्यत्त्व

तुम्ही हे ऐकू शकता का?

तार्सस येथे राहणारा शौल येशू ख्रिस्ताचा प्रेषित "पौल" बनतो (प्रेषित 9:1-22)

शौल, आधी येशू ख्रिस्ताचा आणि त्याच्या अनुयायांचा द्वेष्टा व शत्रू होता. परंतू नंतर हाच "शौल" पहिल्या शतकातील मंडळीच्या पुढाऱ्यांपैकी अतिशय महत्त्वाचा पुढारी आणि शुभवर्तमानाचा मिशनरी "पौल" झाला. एकदा असे झाले की पौल, हे नाव ठेवण्या अगोदरचे त्याचे खरे नाव शौल होते, तो दिमिष्कांच्या रस्त्याकडे जात असता. स्वर्गातून एक फार तेजस्वी प्रकाश त्याच्यावर प्रकाशला आणि तो जमिनीवर पडला. त्या प्रकाशाच्या तेजामुळे तो अंध झाला. शौलाला एक वाणी ऐकू आली "शौला, शौला, तू माझा छळ का करतोस?" "हे प्रभू तू कोण आहेस ?" शौलाने प्रतिप्रश्न केला. "ज्याचा तू छळ करतोस तो मी येशू आहे." शौल घाबरला आणि थरथर कापू लागला. तीन दिवसापर्यंत त्याला काहीही दिसेनासे झाले. तीन दिवसापर्यंत तो अंधळा राहिला. तीन दिवस त्याने काहीही खाल्ले नाही व तो काहीही प्याला देखील नाही. हनन्या नावाच्या एका देवाच्या भक्ताला देवाने सांगितले की, "तू जा आणि शौलाला शोधून काढ. हनन्या, माझी इच्छा आहे की तू शौलाची दृष्टी पुन्हा येईल असे करावे. मी त्याला माझा मिशनरी म्हणून निवडले आहे." हनन्याला हे काहीही समजले नाही, कारण शौल हा ख्रिस्ती लोकाविरुद्ध ज्या काही भयंकर गोष्टी करत होता त्या सर्वांचे वर्तमान त्याने ऐकले होते. परंतु हनन्याने देवाच्या आज्ञांचे पालन केले. देवाने शौलाला बरे केले, मग शौल येशू जेथे कुठे गेला, तेथे येशू विषयीचे शिक्षण व येशूविषयीचा उपदेश देऊ लागला. त्याच्यामुळे अनेक लोक येशूचे अनुयायी झाले. याच "शौलाचे" नाव "पौल" ठेवण्यात आले. पवित्र शास्त्रामध्ये पौलाचे शिक्षण आणि त्याने मंडळ्यांना लिहलेली भरपूर पत्रे आहेत. त्याने येशूसाठी या जगाची उलथापालथ केली. आणि त्याने सर्व गौरव देवाला दिले, आणि इतरांनीही तसेच करावे हे शिकवले.

तुम्ही हे करू शकता का?

- तुमच्या अंतःकरणात निश्चय करा की मी जे काही करणार ते केवळ देवासाठी करणार आहे.
- तुमचे कौशल्य आणि तुमच्यामधील असलेल्या क्षमता या देवा पासून आलेल्या आहेत हे ओळखा.
- तुम्ही जे काही करता ते प्रभू येशू कृपेत एक प्रेमाची भेट म्हणून करा.
- इतरांनी येशूचे अनुयायी बनावे यासाठी तुम्ही त्यांना धैर्याने आमंत्रण देण्याचे धाडस देवाकडे
- तुम्ही जेथे कुठे जाता तेथे त्याची प्रीती इतरांकडे पोहोंचवावी अशी देवाकडे प्रार्थना करा.

शिष्यत्त्व

वर्कशीट

1. वॉव्ह!! तुम्ही जवळ पास शेवटापर्यंत आले आहात. तुम्हांला शिष्यत्त्वातील नववी ओळ आठवते का? ती येथे लिहा?

2. रिकाम्या जागा भरा

   मत्तय 28:19

   "तेव्हा_____जाऊन सर्व _____लोकांना _____ करा त्यांना_____,_____

   व_____बाप्तिस्मा द्या."

3. मिशनरी म्हणजे काय?

4. तुम्ही आणि मी मिशनरी कसे बनू शकतो, आणि शेजाऱ्यांमध्ये येशूचे शिष्य कसे तयार करू शकतो?

5. प्रतिक्रियाची वेळ

   असा व्यक्ती जो येशूला ओळखत नाही, त्याचे नाव तुम्ही सांगा. तुमच्या परिचयातील एखादा व्यक्ती जो येशूला ओळखत नाही त्याचे नाव सांगा. त्याचे नाव एखाद्या कार्ड वर लिहा आणि त्याच्यासाठी दररोज प्रार्थना करण्याचा निर्णय घ्या. लक्षात ठेवा, की देव त्याच्या प्रेमाविषयी इतरांना सांगण्यासाठी तुमचा उपयोग करू घेतो.

शिष्यत्व

हे आहे

प्रीती करण्यासाठी मला देवाचे हृदय हवे आहेत!

हवे आहे, हवे आहे!

देव मला त्याचा एक छोटा सेवक म्हणून उपयोग करू शकतो

करू शकतो करू शकतो!

त्याच्या कधी न संपणाऱ्या प्रेमाची गोष्ट सांगण्यास

मला जायचे आहे!

त्याच्या कधी न संपणाऱ्या प्रेमाची गोष्ट सांगण्यास

गोष्ट सांगण्यास गोष्ट सांगण्यास!

मला जायचे आहे आणि येशूच्या नावात शिष्य बनवयचे आहे

बनवयाचे आहेत बनवयाचे आहेत!

तुम्ही मला मदत कराल का

मदत कराल का मदत कराल का!

शिक्षक पहिल्याने काळ्या रंगातील शब्द वाचतील आणि मुले निळ्या रंगातील शब्द वाचून प्रतिसाद देतील. त्यानतंर तुमच्या वर्गामध्ये तुम्ही सुद्धा एकत्रितपणे असेच एखादे गीत लिहावे म्हणून त्यांना उत्साहित करा आणि त्यांनी दिलेली, लिहिलेली, बोललेली कल्पना तुम्ही फळ्यावर लिहा. त्यांनी जे गीत लिहिले ते गीत मिळून गातांना कशी ऊर्जा निर्माण होते त्याचे निरीक्षण करा

अधिकार

तुम्ही हे बोलु शकता का?

मी येशूच्या नावाने प्रार्थना करतो. आमेन.

फिलिप्पय 2:9
ह्यामुळे देवाने त्याला अति उच्च केले, आणि सर्व नावांपेक्षा जे श्रेष्ठ नाव ते त्याला दिले.

तुम्ही हे शोधू शकता का?

मत्तय 1:21

मत्तय 28:18

योहान 14:13

प्रेषित 4:12

तुम्हांला हे जाणवते का?

तुम्हांला या जगावर जर अधिकार असता तर तुम्ही काय केले असते?

येशूच्या नावात सामर्थ्य का आहेत?

हे चांगले काय आहे. आपण येशूच्या नावात प्रार्थना का करावी?

हे जग येशूच्या अधिकारात आहे.

अधिकार

"पॉपकॉर्न प्रार्थना"
एकांताचे सत्र

मुलांनी एका वाक्यात येशूच्या नावात प्रार्थना करून एखादी विनंती करावी असे त्यांना उत्साहित करा. स्वतःसाठी किंवा एखाद्या जवळच्या व्यक्तीच्या आरोग्यासाठी ती प्रार्थना असू शकते, किंवा त्यांनी प्रीतीमध्ये वाढावे म्हणून किंवा देवाने त्यांना एका विशिष्ट प्रकारे उपयोग करण्यासाठी ही प्रार्थना असवी

चला बोलू या!

- पवित्र शास्त्र सांगते,"स्वर्गात आणि पृथ्वीवर सर्व अधिकार मला देण्यात आला आहेत" जेव्हा आम्ही येशूच्या नावात प्रार्थना करतो तेव्हा आमच्याकडे अधिकार असतो
- यामुळे हा प्रश्न निर्माण होतो की आपण येशूच्या नावात प्रार्थना केली असता, देवाने जे काही करावे असे आम्हाला वाटते ते सर्वकाही तो करतो काय?
- मला जे काही पाहिजे ते सगळे काही देव देईल, असा त्याचा अर्थ होतो काय?

आमच्या प्रार्थनांचे लक्ष स्वर्गीय पित्याचे गौरव करणाऱ्या आणि पृथ्वीवर त्याचे राज्य वाढविणाऱ्या गोष्टींकडे असावे. लेकरांना त्यांच्या प्रार्थना जीवनाविषयी उघडपणे बोलू द्या. त्यांनी केलेल्या प्रार्थनांची उत्तरे त्यांना अनुभवायला मिळाली आहेत काय? त्यांची इच्छा होती किंवा त्यांच्या अपेक्षेप्रमाणे त्यांच्या प्रार्थनेचे उत्तर त्यांना मिळाले नाही, म्हणून त्यांच्यापैकी कोणाला निराशा किंवा हताशा जाणवली आहे का?

अधिकार

तुम्ही हे ऐकू शकता का?

अंधळा बर्तीमय (मार्क 10:46-52)

यरीहोच्या रत्यावर बर्तीमय नावाचा एक अंधळा राहत असे, तो एक भिकारी होता. त्याला येशू विषयी आणि तो जे चमत्कार करत होता त्या विषयी माहीत होते. येशूने आजाऱ्यांना, अंधळ्यांना आणि जे चालू शकत नाही अशांना बरे केले होते, हे त्याने ऐकले. येशूने आपल्यालाही बरे करावे, असे बर्तीमयास वाटत असे. एकदा त्याच्या जवळून गर्दी जात असतांना त्याने विचारले, "कोण जात आहे तेव्हा लोकांनी उत्तर दिली येशू जात आहे." म्हणून तो मोठ्याने ओरडला, "येशू, स्वामी, माझ्यावर दया करा! माझ्यावर दया करा!" परंतु त्या गर्दीत चालणारे लोक बर्तीमया सोबत चांगले वागले नाही. ते त्याच्यावर ओरडू लागले," ऐ गप्प बस!" परंतु बर्तीमयाने त्यांच्याकडे दूर्लक्ष केले, आणि तो येशूच्या दिशेने मोठ्याने ओरडू लागला. येशूने त्याची वाणी ऐकली आणि लोकांना म्हणाला,"त्याला माझ्याकडे आणा" मग गर्दीतून लोकांनी त्याला म्हटले, "अरे ऊठ!! तो तुला बोलवत आहे!" बर्तीमयाने आपल्या अगांवरील अंगरखा आणि गाठोळे फेकले, आपल्या पायावर उठून उभे राहिले आणि येशूकडे जाऊ लागला." "तुला काय हवे आहे?" येशूने विचारले, "बार्तीमयाने उत्तर दिले, मी पाहावे अशी माझी इच्छा आहे!" मग येशूने त्याला उत्तर दिले, "तुझ्या विश्वासाने तुला बरे केले आहे." येशूकडे लोकांना बरे करण्याचे सामर्थ्य आहे हा बार्तीमयाने विश्वास ठेवला. बर्तीमय पाहू लागला त्यामुळे तो किती आनंदी असेल हे तुम्हांला कल्पना करता येईल. आणि तुम्ही कल्पना करू शकता का की जेव्हा त्याचे डोळे उघडले. त्यावेळेस त्याला येशू दिसला. त्यानंतर तो कधीच आधी सारखा राहिला नाही. तो येशूचे अनुसरण करू लागला. आणि येशूने त्याच्यासाठी ज्या अद्भुत गोष्टी केल्याने त्याने सर्वत्र लोकांना सांगितले..

तुम्ही हे करू शकता का?

- तुमच्या स्वर्गीय पित्याचे गौरव करतील अशा गोष्टींसाठी प्रार्थना करायला सुरुवात करा.
- देवाला येशूच्या नावाने ज्ञान आणि मार्गदर्शन मागा..
- देवाला येशूच्या नावात आरोग्य आणि शक्ती..
- आपल्या अंतःकरणात हे विश्वास ठेवा, की येशूच्या नावात सामर्थ्य आहे.

अधिकार

वर्कशीट

1. अभिनंदन तुमच्या प्रार्थनातील शेवटली ओळ **अधिकार** येथे तुम्ही आला आहात! काय तुम्ही ती ओळ येथे लिहू शकता?

2. रिकाम्या जागा भरा

   फिलप्पय 2:9 “ह्यामुळे देवाने त्याला_____केले, आणि _____जे _____ _____

   ते_____दिले”

3. आता तुम्ही पवित्र शास्त्रातून जी गोष्ट ऐकली त्या नुसार येशूने बार्तीमयला बरे केले, असे तुम्हांला का वाटते? जर येशूने बार्तीमयाचाआवज ऐकला असेल तर काय तो तुमचा ही ऐकू शकतो? मग जर येशू तुमचे ऐकू शकतो तर जशी त्यांना बर्तीमयाची प्रार्थना ऐकलीतशीच तो काय तुमची प्रार्थना ऐकू शकतो? या प्रश्नाचे उत्तरे होय! आहे तुम्ही देवाला आरोग्य शक्ती तुमच्या स्वत:साठी मदत किंवा इतरांसाठी सहकार्य मागू शकता, कारण देव तुमच्या प्रार्थना ऐकतो व त्याची उत्तर ही देतो! असे

4. प्रतिक्रिया वेळ

   एक प्रार्थनेचे विनंती टाकण्यासाठी डब्बा बनवा. तुम्ही कोणताही डब्बा वापरु शकता बूट ठेवण्याचा डब्बा एखादा पार्सल आलेला डब्बा आणि कुठलाही आकार तुम्ही निवडू शकता. तुम्ही त्या डब्बाला एक सुंदर रंगीत कागद लावा आणि तुमचे आवडते स्टिकर्स तेथे लावाआणि त्यावर चांगल्या अक्षरात माझ्या प्रार्थनेचा खोका असे लिहा. तुमच्या प्रार्थना विनंती लिहा आणि त्या बॉक्समध्ये त्या दररोज टाका. जेव्हा देव तुमच्या प्रार्थनेचे उत्तरे देतो तेव्हा तुम्ही त्याही लिहा, आणि त्या डब्ब्यात टाका देव तुमची प्रार्थना एकतो आणि त्याचे उत्तरे देतो म्हणून देवाचे आभार माना!

अधिकार

हे आहे

येशूचे नाव सर्व नावाहून क्षेष्ठ आहे

आमेन आमेन !

येशूच्या नावात सत्य आणि अधिकार आहे

आमेन आमेन !

येशूच्या नावामध्ये आम्हांला आरोग्य व सामर्थ्य प्राप्त व्हावे!

आमेन आमेन

येशूच्या नावात आम्हांला आशा आणि आनंद आहे!

आमेन आमेन !

येशूच्या नावात कृपा आणि शांती आहे!

आमेन आमेन !

येशूच्या नावात आम्हांला पूर्ण प्रीती सापडते !

आमेन आमेन !

आपण सगळे एका मनाने प्रार्थना करू या! येशूच्या नावात!

आमेन !

शिक्षक पहिल्याने काळ्या रंगातील शब्द वाचतील आणि मुले निळ्या रंगातील शब्द वाचून प्रतिसाद देतील. त्यानतंर तुमच्या वर्गामध्ये तुम्ही सुद्धा एकत्रितपणे असेच एखादे गीत लिहावे म्हणून त्यांना उत्साहित करा आणि त्यांनी दिलेली, लिहिलेली, बोललेली कल्पना तुम्ही फळ्यावर लिहा. त्यांनी जे गीत लिहिले ते गीत मिळून गाताना कशी ऊर्जा निर्माण होते त्याचे निरीक्षण करा

माझ्या प्रार्थना कराराची नोंद

नाव	दिनांक

कुटुंब किंवा माझी मंडळी 40 दिवसाच्या प्रार्थनेच्या कराराचा अनुभव कशा घेऊ शकते?

प्रार्थनेच्या कराराचा अनुभव घेण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे मंडळी आणि कुटूंब ह्यांनी प्रार्थनेच्या जीवन शैलीचा आरंभ करणे हा होय.

कुटुंब

एखाद्या कुटूंबाने प्रार्थनेसाठी एकत्र येणे ह्यामध्ये कोणकोणत्या अडचणी येऊ शकतात ह्याची यादी करावी तेवढी छोटीच!. परंतु प्रार्थनेचा करार तुम्हांला एकत्रित प्रार्थना करणे शक्य व्हावे ह्याचे काही सोपे व साधे मार्ग सुचवते.

तुम्ही एकत्र जेवण करता तेव्हा त्याचा शेवट बालमित्रांच्या प्रार्थना करारातील प्रार्थनेने होऊ शकतो कदाचित तुम्ही एकत्रितपणे ही प्रार्थना म्हणू शकता! तुमच्यापैकी कोणी एखादा मोठ्याने ही प्रार्थना म्हणत असता, तुम्ही इतर शांततेने देखिल प्रार्थना करू शकता! ह्या प्रार्थनेतील प्रत्येक ओळ टेबलावरील जेवण्यास बसलेल्या व्यक्ती देखिल आळीपाळीने म्हणू शकतात. तुम्ही नवीन कल्पना आणू शकता! दररोज रात्री तुम्ही वेगवेगळ्या पद्धतीने ही प्रार्थना करू शकता. प्रार्थना लांब लचक नसावी ती थोडीशी छोटी, सोपी आणि मर्यादित असावी. सहाजिकच प्रार्थना करत असतांना तुम्हांला काही प्रश्न पडतील किंवा तुम्ही मनन करू लागाल, आणि देव तुमच्या कुटूंबात जसे काम करत आहे त्या पध्दतीने तुम्ही निर्णय घेऊ लागाल. तुमच्या लेकरांच्या आध्यात्मिक जिज्ञासुपणाविषयी तुम्ही विशेषरीत्या संवेदनशील व्हा. तुमची चर्च नैसर्गिकरितीने वाहू लागते तेव्हा आध्यात्मिक सत्य व त्यावरील विचार विनिमय बराच काळ आनंददायी ठरू शकतात. रात्री झोपेच्या वेळेस आई आणि वडील आपल्या बालमित्रांसाठी ह्या पुस्तकातील गोष्टींचे वाचन करू शकतात! किंवा तुमचा मुलगा ती गोष्ट वाचत असता तुम्ही ते ऐकू शकता. बालमित्रांसाठीचा प्रार्थना करार ह्या पुस्तकाच्या मागे दिलेली वचने कदाचित रात्रीच्या वेळेस तुम्ही तुमच्या मुलांसाठी वाचू शकता. रात्री झोपतांना तुम्ही शिक्षकांसाठी दिलेल्या पुस्तकांच्या उत्तरार्धातील अनेक बाबींविषयी नवीन मार्गाने विचार करून तुमच्या प्रार्थनेत बदल करू शकता.

बालमित्रांसाठीच्या प्रार्थना कराराचे कार्ड जर तुमच्याकडे उपलब्ध असतील तर फार बरे होईल कार्ड तुम्ही आपल्या जेवणाच्या खोलीत किंवा तुमच्या झोपण्याच्या खोलीत लावू शकता तुम्ही ते ह्या वेबसाईडवरून ऑडर करू शकता.

मंडळी:

लेकरांच्या आध्यात्मिक विकासासाठी मंडळी अतिशय महत्त्वाचे कार्य करणारे साधन आहे. येशू ख्रिस्ताचे विश्वास पूर्ण अनुयायांची पिढी जर आपल्याला निर्माण करायची असेल तर त्यांनी वेगवेगळ्या पिढीच्या विश्वासणाऱ्यांच्या समाजामध्ये वाढणे आवश्यक आहे त्यामुळे त्यांना येशू संगतीचे संबंध विकसित होण्यास मदत होईल. हे संबंध जोपासण्यासाठी व त्यांना पोषण देण्यासाठी प्रार्थना ही एक प्रभावी साधन आहे. बालमित्रांसाठीचा प्रार्थना करार प्रार्थनेसाठी एक मजबूत पाया उभारण्याचे शैक्षणिक साधन आहे आणि ते सर्वत्र उपलब्ध आहे असा आमचा विश्वास आहे. हा अभ्यासक्रम अतिशय लवचिक आहे त्यामुळे तुम्ही सन्डे स्कुल क्लास किंवा दहा ते बारा आठवड्यांचा अभ्यासक्रम किंवा एखादा व्ही. बी एस (व्हॅकेशनल बायबल स्कुल) प्रोग्राम किंवा लहान गटासाठीचा शास्त्र अभ्यास अशा वेगवेगळ्या प्रकारे याचा उपयोग करू शकता.

तुम्ही मुलांना अगोदर दहा आठवड्यांच्या अभ्यासक्रमाद्वारे दहा वेगवेगळ्या विषयांमधून शिष्यत्त्व निर्माण करा. आणि त्यानंतर त्यांच्या मित्राला किंवा कुटुंबीयांतील सदस्याला ४० दिवस ती प्रार्थना करण्याच्या करारात आमंत्रित करण्यासाठी सांगा. त्यानंतर मुलांनी बालमित्रांसाठीचे प्रार्थना कराराचे क्लब तयार करण्यासाठी तुम्ही त्यांना पाठवू शकता. हे क्लब दर आठवड्याला एकत्र येतील आणि त्यांच्या चर्चसाठी, त्यांच्या शाळेसाठी त्यांच्या मित्रांसाठी, त्यांच्या कुटूंबासाठी प्रार्थना करतील. प्रार्थना सामर्थ्य आहे. आणि प्रार्थनेचे सामर्थ्य मुलांनी अनुभवण्यास आपण परवानगी दिल्यामुळे त्यांचा विश्वास कितीतरी प्रकारे बळकट होण्याची संधी उपलब्ध होईल. तुम्ही आमचे वेबसाईट पेज तपासण्यास विसरू नका नक्कीच ह्या पेजला भेट द्या.

https://theprayercovenant.org/kids/.

तुम्हांला वरील वेब पेज वर वेगवेगळी साधने चित्र साक्ष जगातील सर्व मुलांकडून मिळतील. आम्हाला गोष्टी आवडतात कृपया तुम्ही देखील आपल्या प्रार्थना कराराच्या गोष्टी आम्हाला सांगा. तुमची आम्ही वाट पाहू.

समारोह

जेव्हा आपण असंख्य लाकडे एकत्र पेटवतो त्यावेळेस एक मोठी आग तयार होते आणि ती फार मोठा प्रकाश देते तसेच प्रार्थनेच्या कराराने जेव्हा प्रार्थनेच्या कराराचे सामर्थ्य तेव्हा अधिक प्रमाणात निर्माण होते. जेव्हा सगळे सदस्य एकत्रित व एकमेकांसाठी प्रार्थना करतात. जेव्हा एक संपूर्ण कुटूंब प्रार्थना करारात एकत्रितपणे प्रवेश करते, आई आणि वडील आणि मुले, त्याचे सामर्थ्य आतमध्ये व परिवाराच्या बाहेरही सामर्थ्याने प्रकाशते! ही संसाधने ह्या ठिकाणी उपलब्ध आहे www.theprayercovenent.org

मी तुम्हांला कशी मदत करू शकतो?

तुम्ही दिलेले दान नक्किच बदल घडवू शकतात!

बालमित्रांसाठीच्या प्रार्थना कराराला आपण पुढे आणि पुढे घेवून जाऊ या संपूर्ण विश्वाच्या चारही दिशेने ते पसरविण्यास आम्हांला सहकार्य करा

2018 पर्यंत सध्या आम्ही आशिया आफ्रिका लॅटिन अमेरिका आणि मिड्ल ईस्टच्या 48 देशांमध्ये पोहोंचलेलो आहोत. .

लेकरांच्या प्रार्थना चळवळीची सुरुवात झाली आहे आपण या चळवळीत सहभागी होऊया कृपया या वेबसाईटला भेट द्या

https://theprayercovenant.org/kids/

बालमित्रांसाठी!

40 दिवसांचा

प्रार्थना

करार

अभिनंदन

तुम्हा सर्वांना अभिनंदन! तुम्ही बालमित्रांच्या प्रार्थना कराराच्या अभ्यासक्रमाला पूर्ण केले आहे आणि देवाच्या प्रीती व कृपेचा द्वारे परिवर्तन घडवणाऱ्या स्वभावाविषयी तुम्ही सर्व शिकले आहात.

आपण शिकलेल्या गोष्टी मधील मेंढराप्रमाणे आम्ही सर्वजण आपापल्या पापांमध्ये हरवलेले आणि देवापासून भटकलेले असे होतो. आम्ही देवापासून दुरावलेले आहोत. परंतु आमच्या पापांपासून आम्हाला सोडवण्यासाठी आपला उत्तम मेंढपाळ येशू आम्हासाठी आला आहे. आमच्या पापाचे प्रायश्चित्त करण्यासाठी त्याने वधस्तंभावर आपला प्राण दिला आणि तिसऱ्या दिवशी तो पुन्हा जिवंत झाला. आम्ही आपल्या अंतकरणात मध्ये त्याला आपला वैयक्तिक प्रभू व तारणारा म्हणून स्वीकारले तर तो आमच्या पापांची क्षमा करतो आणि आमचे तारण करतो. आपण हरवलेल्या मेंढराच्या गोष्टींमध्ये पाहिले तसेच आजही तो आमचा शोध घेत आहे कारण तो उत्तम मेंढपाळ आहे.

तुम्ही विश्वास ठेवून ही साधी प्रार्थना केली तर तुम्ही येशूसोबत सदासर्वकाळ राहाल व तो तुमच्या पापांची क्षमा करेल.

> ***स्वर्गिय पित्या,***
>
> ***मला माझ्या पापांची क्षमा करा मला शुद्ध करा***
> ***मी तुम्हाला आपल्या अन माझ्या अंत:करणामध्ये माझा वैयक्तिक कारण करणारा व प्रभू म्हणून स्वीकारत आहे***
> ***माझ्यावर प्रिती केल्याबद्दल व मला आपल्या मुलांपैकी एक केल्याबद्दल मी तुमचे आभार मानतो***
>
> ***येशूच्या नावाने प्रार्थना केली म्हणून तू आहे का मेईन***

हरवलेले मेंढरू सापडल्यानंतर जसा मेंढपाळाने अतिशय मोठा आनंद व उत्सव साजरा केला. अगदी तसाच उत्सव देखील आमच्यासाठी येशू साजरा करतो. तो आम्हाला असे म्हणतो की, " तुमचा प्रभूदेव तुमच्यासोबत आहे कारण करण्यासाठी तो समर्थ असा देव आहे तो तुमच्यावर अत्यंत प्रसन्न आहे आणि तो तुमच्यावर आनंद करणार आहे" सफन्या ३:१७

देवा ची बातमी तुम्ही आता इतरांना सांगण्यास सुरुवात करू शकता. येशूच्या मागे चालणे म्हणजे काय हे तुम्ही यावरून शिकवू शकणार